नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## कोलंबियाच्या राष्ट्रपती पदाच्या उमेदवारावर गोळीबार

■ वृत्तसंस्था, बोगोटा, दि. ८ :

दक्षिण अमेरिकन देश कोलंबियामध्ये, राष्ट्रपती पदाचे उमेदवार मिगुएल उरीबे यांच्यावर निवडणूक प्रचारादरम्यान गोळीबार करण्यात आला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. ही घटना स्थानिक वेळेनुसार शनिवारी संध्याकाळी घडली. उरीबे राजधानी बोगोटा येथे एका रॅलीला संबोधित करत होते. कोलंबियामध्ये २०२६ मध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुका होणार आहेत. मिगुएल उरीबे हे अध्यक्षपदाचे प्रमुख दावेदार मानले जातात. ३९ वर्षीय उरीबे हे विरोधी सेंट्रो डेमोक्रॅटिको कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे सदस्य आहेत.

* वर्ष ५५ * अंक ७१ * * नागपूर * सोमवार, दिनांक ९ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

## गरिबी : भ्रामक की सत्य?

आपल्या भारतातील दारिद्य रेषेखालील लोकांची संख्या कमी झाली आहे. असे आपण म्हणत नाही, तर असे जागतिक बँक म्हणते. जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार मागील १४ वर्षांमध्ये भारताने वेगाने प्रगती केलेली आहे. त्यापैकी २०११ ते २०१४ या काळात काँग्रेस प्रणित सरकारची सत्ता होती. त्यानंतरच्या काळात भाजप प्रणित सरकार आहे. २०११-१२ मध्ये देशात जवळजवळ ३५ कोटी लोक गरीबीचे जीवन जगत होते. आता त्यातून २७ कोटी नागरिक गरीबीतून बाहेर पडलेले आहेत. म्हणजे आपल्या देशाने गरीबी कमी करण्यात अशी उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. त्यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश यासारख्या राज्यांचा समावेश आहे. बिहार हे राज्य आजारी राज्य आहे असे म्हटले जात होते. तर उत्तर प्रदेश वाढीव लोकसंख्येच्या दबावाखाली होते. अलीकडच्या काळात भारतातील या राज्यांत गरिबीमुक्त नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. ती आकडेवारी पाहता भारतातील बेरोजगारी, भारतातील कमी झालेली काम कारखानदारी याचा कोणताही परिणाम विकासावर झालेला नाही, असे म्हणावे लागेल. आपल्या देशात पंतप्रधान आवास योजना, उज्वला योजना, जनधन योजना, आयुष्यमान भारत योजना या महत्त्वाच्या उपक्रमांमुळे देशात गरिबी कमी झाल्याचे म्हणावे लागेल. या योजनांमुळे गृहनिर्माण तसेच स्वयंपाकासाठी लागणारे कच्चे इंधन, बँकिंग आणि आरोग्य सेवा यात भारताने लक्षणीय प्रगती केल्याचे दिसेल. आपल्या देशातील सर्वाधिक श्रीमंत माणूस आणि गरीब माणूस यांच्या दैनंदिन किंवा मासिक आमदनीत दहा ते पंधरा हजार पटींचा फरक आहे. म्हणजे उदाहरणार्थ अदानी, अंबानी यांचे जेवढे दररोजचे इतके उत्पन्न आहे की ते उत्पन्न एखाद्या मध्यम आकाराच्या राज्यातील सर्व गरिबांच्या उत्पन्नापेक्षा जास्त असेल. पण आता सरकारच्या विविध योजनांमुळे अनेकांना सरकारतर्फे वेगवेगळ्या योजनांच्या नावावर चांगला पैसा मिळू लागलेला आहे. हा चांगला पैसा मिळतो. म्हणून आता मजूर किंवा कामगार वर्ग अत्यंत कमी प्रमाणात कामावर जातो, असे दिसून आले आहे. खेड्यापाड्यात शेतकऱ्यांना शेतातील कामासाठी मजुरांची टंचाई जाणवते. भारतभर मोठमोठ्या गृहनिर्माण किंवा सडक निर्माण योजना सुरू आहेत. त्यात काही काम स्वयंचलित मशीनद्वारे होत असले. तरी मजुरांची टंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. त्यामुळे उपलब्ध मजूर किंवा कामगार यांना मोठ्या प्रमाणावर मजुरी वेतन देण्यात येते, असेही दिसून आले आहे. या परिस्थितीमुळे का होईना, मजुरांना आणि कामगारांना बरे दिवस आलेले आहेत. असे जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार दिसून येत आहे. पूर्वी खेड्यापाड्यात मजुरांची मजुरी जमीनदार ठरवीत असत. आता ती मजुरी किती असावी, ते शेतीमध्ये काम करणारे मजूर ठरवतात. अमुक एवढी मजुरी दिली तरच कामावर येऊ, असा प्रकार असतो. याचे महत्त्वाचे कारण असे की आता पोट भरण्यासाठी सरकारकडून अन्नधान्य मिळते. तसेच इतर योजना सुरू आहेत. त्यामुळे मजुरी न करता ही आपण पोटभर खाऊ शकतो अशी एकूण परिस्थिती आहे. आता कामगारांना किंवा मजुरांना आपल्या मागण्या दीनवाणे होऊन मागाव्या लागत नाहीत. तर आता त्यांच्या मनाप्रमाणे मजुरी मिळते. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच पूर्वी महिनाभर काम करून जेवढी मजुरी मिळत होती. त्यापेक्षा जास्त मजुरी महिन्यातून फक्त दहा ते बारा दिवस काम केल्यावर मिळत असते. एकूणच देशाच्या आर्थिक आरोग्याच्या दृष्टीने आणि समाजवादी समाज रचनेच्या दृष्टीने ही आनंदाचीच बाब आहे. आता जमीन धारकांनीही कमीत कमी मजूर लागतील. अशा प्रकारे शेती करणे सुरू केलेले आहे. शेतीसाठी अनेक उपकरणे उपलब्ध आहेत. तीच परिस्थिती शहरातही कायम झालेली आहे. कापडाच्या गिरणीमध्ये पूर्वी जेवढे कामगार लागत असत. त्यापेक्षा १०% कामगारांमध्येही आता तितकेच काम होऊ शकते. अशीच परिस्थिती इतर अनेक उद्योगांमध्ये आहे. दहा-बारा महिला काम करून जेवढ्या पोळ्या लाटू शकतात. त्यापेक्षा चांगले आणि सफाईदार काम एक मजूर पोळ्या लाटण्याच्या मशीनद्वारे सहज करू शकतो. पोळ्याही अतिशय मुलायम बनतात. सरकारी नोकरांच्या पगारात एवढी भरमसाठ वाढ झालेली आहे की, आता सरकारलाही नव्या भरती योजना करण्याची इच्छा होत नाही. त्यापेक्षा कंत्राटी पद्धतीने सरकार ही सर्व कामे करून घेत आहे. या सर्व परिवर्तनाच्या व्यावहारिकतेमुळे प्रत्यक्षात काम करणाऱ्यांना कमी प्रमाणात का होईना. पण पूर्वीपेक्षा जास्त मजुरी मिळत असते. हे आपण अनुभवू शकतो. जागतिक बँकेने भारतातील गरिबी कमी झाल्याचे जाहीर केल्यामुळे आता सरकारला ८० कोटी लोकांना फुकट अन्नधान्य देणे गरजेचे राहणार नाही. मात्र त्यांची गरिबी नष्ट झाली असली. तरी त्यांचे मतदान गरजेचे असल्याने गरिबी रेषेच्या वर आल्यावरही या फुकट वाटपाचा कट असाच शिजत राहील. त्यामुळे आता गरिबीतून वर आलेल्या आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांमध्ये मोडणाऱ्या भारतातील कोट्यावधी लोकांचा फायदाच होईल. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### मतदान वाढलेल्या जागी एनडीए जिंकली म्हणणे हास्यास्पद

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:

काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका वृत्तपत्रात लिहिलेल्या 'मॅच फिक्सिंग महाराष्ट्र' मुलाखत देताना भाजपवर जोरदार टीका केली आहे. २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका या लोकशाही यंत्रणेमध्ये हेराफेरी करण्यासाठी तयार केलेला मॅच फिक्सिंगचा आराखडा होता. आता हेच प्रकार बिहारमध्येही होणार आहे. भाजपला जिथे जिथे हार पत्करावी लागते तिथे अशा प्रकारची गैरकृत्ये केली जातात, असा हल्लाबोल राहुल गांधींनी केला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखानेच प्रत्युत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी त्यांचे लेखात २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते; पण त्यानंतरही हे आकडे वाढत गेले. मतदानाची अंतिम टक्केवारी ६६.०५ टक्के असल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी सांगण्यात आले. म्हणजे या मतांमध्ये ७.८३ टक्क्यांची वाढ झाली. राज्यातील केवळ १२००० बूथमध्ये नव्या मतदारांची भर पडली. त्यातील ८५ मतदारसंत भाजपला विजय मिळाला होता, असा दावा राहुल गांधींनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या लेखाला प्रत्युत्तर देताना म्हटले की, शेवटच्या तासात मतदान वाढलेल्या जागी एनडीए जिंकली म्हणणे हास्यास्पद आहे. कामठीचे उदाहरण त्यांनी दिले.



### राहुल गांधींचे लेखातून भाजपवर गंभीर आरोप

पण जे उदाहरण त्यांनी दिले नाही, ते मी येथे देतो आहे. माढ्यात शेवटच्या तासात १८ टक्के मतदान झाले, तिथे शरद पवार गटाचा उमेदवार जिंकला. वणीत शेवटच्या तासात १३ टक्के मतदान झाले, तिथे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार जिंकला आणि श्रीरामपूरमध्ये १२ टक्के मतदान झाले, तिथे काँग्रेस विजयी झाली.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाबाबत काही पुरावे उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोग त्यांना नक्कीच उत्तर देईल. पण मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा आणि लोकांच्या जनादेशाचा सतत होणारा अपमान, जनतेने राहुल गांधींना नाकारले आहे आणि सूड म्हणून ते जनतेला आणि त्यांच्या जनादेशाला नाकारत आहेत.

यामुळे काँग्रेस पक्ष आणखी अडचणीत येईल. लोकशाही प्रक्रिया आणि संवैधानिक संस्थांबद्दल सतत शंका उपस्थित करून ते देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहेत आणि कोणते विष पसरवत आहेत याची त्यांना जाणीव असली पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मणिपूरमध्ये निदर्शकांनी स्वतःवर ओतले पेट्रोल

■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. ८ :



मणिपूरमधील मैतेई संघटनेचे नेते अरंबाई टेंगोले यांना रविवारी सीबीआयने अटक केली. त्यांच्यावर २०२३ मध्ये हिंसाचार भडकवल्याचा आरोप आहे. त्यांच्या अटकेची बातमी पसरल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा मणिपूरमध्ये हिंसाचार उसळला. राजधानी इम्फाळमधील अनेक भागात निदर्शकांनी वाहनांना आग लावली, रस्त्यांवरील टायर आणि जुने फर्निचरही जाळले. निदर्शकांनी स्वतःवर पेट्रोल ओतून स्वतःला जाळण्याचा प्रयत्नही केला.

सरकारने ७ जून रोजी रात्री ११:४५ वाजल्यापासून पाच दिवसांसाठी पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेट आणि मोबाईल डेटा सेवा बंद ठेवल्या आहेत. यामध्ये इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल, काकचिंग आणि बिष्णुपूर यांचा समावेश आहे. इम्फाळ पूर्व आणि बिष्णुपूरमध्येही कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. कुकी-मैतेई समुदायातील संघर्ष ३ मे २०२३ रोजी सुरू झाला होता, जो अजूनही सुरूच आहे. या दोन वर्षांत ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १५०० हून अधिक जखमी झाले आहेत.

७० हजारांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. ६ हजारांहून अधिक एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील खुराई लामलोंग येथेही एका बसला आग लावण्यात आली. शनिवारी इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यात निदर्शकांनी अनेक वाहने पेटवून दिली.

## राहुल यांनी आम्हाला पत्र लिहिले नाही

### विधानसभा निवडणूक फिक्सिंगच्या आरोपांवर इ.सी.चे उत्तर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरीचा आरोप केल्यानंतर २४ तासांनंतरही लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला कोणतेही पत्र लिहिलेले नाही. तसेच त्यांनी बैठकीसाठी वेळ मागितलेला नाही. निवडणूक आयोगाशी संबंधित एका सूत्राने एएनआय वृत्तसंस्थेला हे सांगितले. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, एकीकडे राहुल गांधी म्हणतात की, त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे गंभीर आहेत, परंतु जेव्हा निवडणूक आयोगाला पत्र लिहिण्याची वेळ येते तेव्हा ते टाळाटाळ करतात. प्रक्रियेनुसार, राहुल गांधी यांनी पत्र लिहिले तरच कोणतीही संवैधानिक संस्था औपचारिकपणे प्रतिसाद देऊ शकते. राहुल यांनी ७ जून रोजी इंडियन एक्सप्रेसमध्ये एक लेख लिहिला होता.

या लेखात त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीत मॅच फिक्सिंग झाले आणि आता बिहार निवडणुकीतही असेच फिक्सिंग होईल, असा दावा केला होता. राहुल गांधी यांनी शनिवारी वर लिहिले होते की, 'तुम्ही (निवडणूक आयोग) एक संवैधानिक संस्था आहात. जर तुमच्याकडे लपवण्यासारखे काही नसेल तर माज्या प्रश्नांची उत्तरे द्या आणि ते सिद्ध करा.' यावर निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी रविवारी वृत्तसंस्थेला सांगितले की, देशभरातील १०.५ लाख बूथ लेव्हल अधिकारी, ५० लाख मतदान अधिकारी आणि १ लाख मतमोजणी पर्यवेक्षक राहुल गांधी यांच्या आरोपांमुळे निराश झाले आहेत.

## पिंडदान करिता गेलेल्या तीन महिलांचा बाघनदीत बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ८:

गोंदिया तालुक्यातील ग्रामपंचायत लईटोला जवळील पगारटोला येथील तुरकर कुटुंबीय यांच्याकडे पिंडदान करिता आल्या होत्या. यातील तीन महिलांचा बाघ नदीतील कोरणी घाटात आंघोळ करीत असताना पाय घसरून पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना रविवार ८ जून रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास घडली. मीनाक्षी संतोष बघेले (३९), नीतू शत्रुधन बघेले (३५), मीराबाई इशुलाल तुरकर (५०) सर्व राहणार नागपूर, असे या घटनेतील मृत महिलांचे नाव आहे.

गोंदिया तालुक्यातील रावणवाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायत लईटोला जवळील पगारटोला येथील तुरकर कुटुंबीय यांच्याकडे मुकेश तुरकर यांचा ३० मे २०२५ रोजी मृत्यू झाला होता. त्याचे पिंडदान करण्याकरिता तुरकर कुटुंबीय व त्यांचे जवळील नातेवाईक रविवार ८ जून रोजी दुपारी गोंदिया तालुक्यातील रावणवाडी पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या कोरणी घाट येथे आले होते. तुरकर कुटुंबीय बाग नदीच्या नदीपात्रात आंघोळी करिता उतरले असता नदीपात्रातील दगडावरून पाय घसरल्यामुळे नीतू शत्रुधन बघेले ही पाण्यात बुडत असताना तिला वाचवण्याकरिता मीनाक्षी संतोष बघेले ही गेली. ती पण बुडू लागली तिला वाचविण्याकरिता मीराबाई इशुलाल तुरकर ही पण धावली असता या तिघींचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## सोलापूर स्मॅशर्सचा रायगड रॉयल्सवर विजय

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८:



महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) २०२५ स्पर्धेत पाचव्या दिवशी पाचव्या लढतीत कर्णधार तेजल हसबनीस (५६धावा) हिने झळकावलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर सोलापूर स्मॅशर्स संघाने रायगड रॉयल्स संघाचा ७ गडी राखून पराभव करत आपली विजयी मालिका कायम ठेवली. गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत रायगड रॉयल्स संघाने पहिल्यांदा खेळताना रायगड रॉयल्स संघाने २०षटकात ६बाद १२९धावा केल्या. भाविका आहिरे ११ धावावर तंबूत परतली. शरयू कुलकणींने भाविका आहिरेला झेल बाद केले. श्रावणी देसाईने एकाबाजूने लढताना ४५ चेंडूत ४३ धावांची संयमी खेळी केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ३६चेंडूत ३१ धावांची भागीदारी केली. त्यानंतर रायगडचे फलंदाज फारशी मोठी खेळी करू शकले नाही. किरण नवगिरे(१८), आदिती गायकवाड (नाबाद १६), यशोदा घोगरे(१८) यांनी धावा केल्या.

### एलपीजी टँकरची ट्रॅव्हल्स बसला जोरदार धडक

# १६ शिक्षक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातील बावनदी येथे रविवारी सकाळी सीएनजी वाहून नेणारा टँकर आणि खासगी ट्रॅव्हल्स यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातानंतर टँकरमधून सीएनजीची गळती झाली आणि हवेत पसरलेल्या गॅसला आग लागली. ही आग जवळच्याच एका घरापर्यंत पोहोचली. या आगीत एका म्हशीचा भाजून मृत्यू झाला असून, घराजवळ उभ्या असलेल्या एक रिक्षा आणि दोन दुचाकींचेही मोठे नुकसान झाले आहे. ट्रॅव्हल्समधील काही प्रवासी जखमी झाले असून, त्यांना तत्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. टँकर मधील उरला सुरला सीएनजी काढून घेण्यासाठी आत्ता वाहतूक थांबवण्यात आली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातील बावनदी येथे रविवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातामुळे एकच खळबळ उडाली.

मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या सीएनजी टँकरने चिपळूणहून रत्नागिरीकडे येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर ट्रॅव्हल्सच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट रस्ता सोडून सुमारे वीस फूट खोल खाली कोसळली. या दुर्घटनेत ट्रॅव्हल्समधील सर्व प्रवासी जखमी झाले असून, त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. अपघातानंतर टँकरमधील सीएनजी भरलेली टाकी रस्त्याच्या कडेला गटाराजवळ जाऊन पडली. यामुळे मोठ्या प्रमाणात गॅसची गळती होऊ लागली. गळती झालेली सीएनजी झपाट्याने हवेत पसरली आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही वेळातच या वायुलाटाला आग लागली आणि ती जवळच्याच घरापर्यंत पोहोचली.

या आगीत एक म्हैस भाजून मृत्युमुखी पडली, तर घराजवळ उभ्या असलेल्या रिक्षा आणि दोन दुचाकी जळून खाक झाल्या. घटनेनंतर स्थानिकांमध्ये मोठी धावपळ उडाली असून, अग्निशमन दल आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. टँकरमधील उरलेली सीएनजी सुरक्षितरित्या बाहेर काढण्यासाठी आणि परिसर सुरक्षित करण्यासाठी वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, अपघात ग्रस्त खासगी ट्रॅव्हल्समधून १६ शिक्षक प्रवास करत होते. ते रत्नागिरीत एका प्रशिक्षणासाठी येत होते. या अपघातात ते सर्वजण जखमी झाले.

महासागर
: प्रभाग मित्र :
धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?
पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?
या... महासागर प्रभाग मित्र व्हा!
अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.
आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.
महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.
अर्जाच्या पाकिटावर 'महासागर प्रभाग मित्र' असा उल्लेख आवर्जून करा.
आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.
: अधिक माहितीसाठी :
9881717811, 9881717816

### जलसंवर्धनासाठी 'वॉटर ग्रीड' तयार करण्याची गरज : नितीन गडकरी

# विदर्भ पाणी परिषदेत शेतीतील जलसंवर्धनावर मंथन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८:




जलसंवर्धनासाठी 'वॉटर ग्रीड' तयार करण्याची गरज केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वनामती सभागृहात ३ दिवसीय विदर्भ पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी रविवार, दि. ८ जून २०२५ रोजी आयोजित कृषी जल परिषदेत गडकरी मार्गदर्शन करीत होते. कृषी जलपरिषदेला प्रमुख अतिथी म्हणून माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी, आमदार डॉ. संजय कुटे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे), गोंडवाना विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ.शरद गडाख, राज्यपालनामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, परिसंवादातील वक्ते डॉ. विजय शरद देशमुख, परिषदेच्या संयोजक तथा अधिसभा सदस्य शुभांगी नक्षिणे उंबरकर यांची उपस्थिती होती. विदर्भात शेतीची मोठ्या प्रमाणात उत्पादकता वाढवायची असेल तर जलसंवर्धन आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन आवश्यक असल्याचे केंद्रीय मंत्री गडकरी पुढे बोलताना म्हणाले. विदर्भातील ६ जिल्ह्यात मागील काही काळात १० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्येचे अध्ययन करताना सिंचनाचा अभाव तसेच कापसाचे कमी उत्पादन मूल्य अशी दोन प्रमुख कारणे निदर्शनास आली.

# लग्नासाठी श्रीमंत 'स्थळं' शोधून फसवणारी टोळी गजाआड

## वडवणीत संगमनेरच्या तीन महिलांसह चौघांना अटक




■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. २५ : श्रीमंत घरच्या मुलांची 'स्थळं' शोधून त्यांना लग्न करून देण्याच्या बहाण्याने लुटणारी चौघांची टोळी वडवणी पोलिसांनी गजाआड केली. या प्रकरणी तीन महिलांसह कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींमध्ये एक बनावट नवरी आहे. त्यांच्याकडून एक चारचाकी व एकाच नावाचे विविध आधारकार्ड जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळाली.वैभवी शेटे (नवरी), मनीषा ननावरे (नवरीची मैत्रीण), रणजीत अहिरे (कारचालक, तिघेही रा. संगमनेर) व यमुनाबाई (मध्यस्थी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या टोळीच्या गुन्ह्याबाबत सांगण्यात आले की, वडवणी पोलीस ठाण्यात ३ जून रोजी मनीषा नरेंद्र ननावरे (वय २५) ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे हिला घेऊन आली. तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिच्या घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले, अशी हकीकत कथन केली. सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणीच्या प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी वैभवी व मनीषा यांची चौकशी केली. तसेच सोडवणूक करणाऱ्या चालकालाही बोलावून घेतले. या तिघांनाही बोलावून घेतल्यानंतर त्यांची स्वतंत्र चौकशी केली. यामध्ये मनीषाचे दोन दिवसांपूर्वी नुकतेच वडवणी तालुक्यातील एका गावातील २८ वर्षीय तरुणाशी लग्न झालेले असून, त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही, आजारासाठी मनीषाच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले, अशी माहिती मिळाली. तसेच मनीषाकडे वेगवेगळे आधारकार्ड असून, तिचे काका व मावशीही बनावट असल्याचे समोर आले. लग्नासाठी मुली मिळत नसल्याने अनेक गरीब, सर्वसाधारण तसेच प्रतिष्ठित कुटुंबांचा शोध घ्यायचा. लग्न होत नसलेल्या तरुणांना सुंदर मुलगी दाखवायची. नंतर तिच्या आईला कर्करोग झाला आहे किंवा तिला आई-वडीलच नाहीत व इतर काही आर्थिक अडचण सांगून पैसे उकळून पसार व्हायचे. तसेच पळून जायला जमले नसल्यास त्याच कुटुंबाविरुद्ध पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करायची. तक्रार मागे घेण्यावर तडजोड करून पुन्हा नवीन ग्राहक शोधणे, अशी या टोळीची गुन्हे करण्याची पद्धत असल्याचे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्यातील महिला रणजीत अहिरेच्या चारचाकी वाहनाचा मुलगी दाखवण्यासाठी अथवा एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी वापर करत होत्या, असे तपासात समोर आले.

## 'हाऊसफुल ५' कसा वाटला? अक्षय कुमार चित्रपटगृहाबाहेर किलर मास्क घालून पोहोचला



**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेता अक्षय कुमार आणि सहकलाकारांच्या विनोदाने सजलेल्या हाऊसफुल या चित्रपटाच्या चारही भागांना चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर 'हाऊसफुल ५' हा हिंदी चित्रपट ६ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या पार्श्वभूमीवर 'हाऊसफुल ५' हा चित्रपट कसा वाटला हे विचारण्यासाठी अक्षय कुमार थेट 'किलर मास्क' घालून वांद्रे येथील एका चित्रपटगृहाबाहेर पोहोचला. हा एक भन्नाट व सुंदर अनुभव असल्याचे अक्षयने समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ पोस्ट करीत सांगितले आहे.बॉलिवूडचा प्रसिद्ध अभिनेता अक्षय कुमार हा रविवार, ८ जून रोजी सकाळच्या सत्रात वांद्रे येथील एका चित्रपटगृहाबाहेर पोहोचला. मात्र यावेळी अक्षय कुमारभोवती चाहत्यांचा घोळका झाला नाही. कारण अक्षयने 'किलर मास्क' घालत चित्रपटगृहाबाहेर एंट्री केली होती. यावेळी 'हाऊसफुल ५' हा चित्रपट पाहून प्रेक्षक चित्रपटगृहाबाहेर पडत होते. याचवेळी अक्षय 'किलर मास्क' घालून प्रेक्षकांना विविध प्रश्न विचारत होता. 'तुम्हाला हाऊसफुल ५ हा चित्रपट कसा वाटला ?' हा प्रश्न प्रामुख्याने त्याने प्रेक्षकांना विचारला. यावेळी प्रेक्षकांनीही चित्रपट उत्तम व चांगला असल्याचे सांगितले. यावेळी अक्षयसोबत अजून दोन व्यक्ती 'किलर मास्क' घालून होत्या. 'किलर मास्क' घातल्यामुळे प्रेक्षक अक्षयला ओळखू शकले नाहीत. मात्र आवाजावरून अक्षयला प्रेक्षकांनी ओळखण्याची दाट शक्यता होती. मात्र प्रेक्षकांनी ओळखण्यापूर्वीच अक्षय तिथून निघून गेला आणि हा एक भन्नाट अनुभव असल्याचे त्याने सांगितले. आज किलर मास्क घालायचे सहज ठरवले आणि वांद्रे येथील चित्रपटगृहातून 'हाऊसफुल ५' चित्रपट पाहून बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकांशी संवाद साधत विविध प्रश्न विचारले. याप्रसंगी प्रश्न विचारताना मला लोकांनी पकडले असते. पण त्यांनी ओळखण्यापूर्वी मी तिथून निघून गेलो.

## वैद्यकीय क्षेत्रातील नोकरीच्या आमिषाने वेश्या व्यवसायाचा विळखा



**मुंबई :** वैद्यकीय क्षेत्रात नोकरी लावण्याचे आमीष दाखवून तीन बांगलादेशी महिलांना मुंबईत आणून त्यांना वेश्या व्यवसायात ढकल्याचा प्रकार घडला आहे. ओळख लवपण्यासाठी त्यांच्या नावाने बनावट आधारकार्डही तयार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी मालवणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

## बदलापुरकरांनो पाणी जपून वापरा



**बदलापूर :** बदलापूर पश्चिम भागात सोमवारी मुख्य जलवाहिनीवर तातडीचे देखभाल दुरुस्तीचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेतले जाणार आहे. त्यामुळे बदलापूर पश्चिम भागात सोमवारी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १२ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. पाणी जपून वापरण्याचे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.बदलापूर शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. उल्हास नदीवर असलेल्या बॅरेज बंधाऱ्यातून पाणी उचलून उचलून शुद्धीकरण केले जाते. त्यानंतर ते बदलापूर, अंबरनाथ शहराला पुरवले जाते. अंबरनाथ शहराचे इतरही जलस्त्रोत असले तरी बदलापूर शहराचे फक्त उल्हास नदी हाच एक जलस्त्रोत आहे.

## हडपसर, मगरपट्टा परिसरातील प्रवाशांसाठी कल्याणीनगर मेट्रो स्थानकापर्यंत 'पीएमपी'ची पूरक सेवा



**पुणे :** हडपसर येथील प्रवाशांना मेट्रोची सेवा मिळण्यासाठी हडपसर गाडीतळ - मगरपट्टा ते कल्याणीनगर मेट्रो स्थानक अशी पूरक सेवा (फीडर) 'पीएमपी'ने सुरू केली. त्यामुळे हडपसरमधील प्रवाशांना कल्याणीनगर मेट्रो स्थानकांपर्यंत सुकर प्रवास करता येणार आहे. सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून प्रवाशांना सुलभ सेवा मिळावी आणि प्रवाशांची संख्या वाढविण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) यांच्या समन्वयाने नियोजन करण्यात येत आहे. हडपसर गाडीतळ-मगरपट्टा कल्याणीनगर या मार्गावरील बससेवेचा पीएमपीच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडेआणि महामेट्रोचे महाव्यवस्थापक राजेंद्र सनेर पाटील यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

# मुंबईपुणे द्रुतगती महामार्ग आता दहापदरी



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ८ : मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास अधिक वेगवान होईल. आता सहा पदरी असलेला हा महामार्ग दहा पदरी करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी एकूण १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. याआधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आठ पदरीकरण करण्याचा निर्णय घेत त्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. आता आठऐवजी थेट दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.येत्या दहा दिवसांत यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. एमएसआरडीसीने मुंबई -पुणे प्रवास अतिजलद करण्यासाठी ९४.५ किमी लांबीचा मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग बांधला. हा महामार्ग २००२ मध्ये पूर्णत: वाहतुकीसाठी खुला झाला आणि मुंबई ते पुणे अंतर केवळ अडीच तासात पार करणे शक्य होऊ लागले. सध्या या महामार्गावरून धावणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे सहा पदरी महामार्ग अपुरा पडू लागला आहे. दररोज ६५ हजार वाहने एमएसआरडीसीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार द्रुतगती महामार्गावरून दररोज ६५ हजार वाहने धावतात.

गर्दीच्या वेळी ही संख्या एक लाखांवर जाते. भविष्यात वाहनांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता एमएसआरडीसीने सहा पदरी महामार्गाचे आठ पदीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. महामार्गाच्या दोन्ही बाजूने एक - एक मार्गिका वाढविण्याचा निर्णय घेत यासंबंधीचा अंदाजे ६०८० कोटी रुपयांचा प्रस्ताव फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविला होता.मात्र आता नव्याने प्रस्ताव तयार करून महामार्गाचे आठऐवजी दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

## परप्रांतीयांची दादागिरी वाढलीदोघा भावांनी एकत्र यायला हवे : माजी महापौरांचे मत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ८ : मुंबईत २०२२ नंतर परप्रांतीयांची संख्या वाढत चालली असून परप्रांतीयांच्या दादागिरीखाली मराठी माणूस दबत चालला आहे, असे मत माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी व्यक्त केले आहे. मराठी माणसाने आपल्याला घाबरून राहावे अशी परप्रांतीयांची दादागिरी कल्याण, डोंबिवली, भांडूप अशा ठिकाणच्या विविध घटनांमधून दिसू लागली आहे. त्यामुळे परप्रांतीयांची दादागिरी मोडून काढण्यासाठी आता मराठी माणसाला ताकद देण्याची गरज आहे. त्याकरीता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे या दोन भावांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही मत पेडणेकर यांनी व्यक्त केले आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन भावांनी एकत्र यावे या बाबतची चर्चा थोड्याथोड्या कालावधीनंतर पुन्हापुन्हा होत असते. तशी ती आता पुन्हा एकदा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून त्यादृष्टीने वातावरण निर्मिती या निमित्ताने सुरू झाली आहे. दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून या दोन भावांच्या एकत्र येण्याची गरज असल्याचे दावे केले जात आहेत. राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडले तेव्हाच्या रागाची धार आता बोथट झाली असून या दोन्ही पक्षातील कार्यकर्ते आता मनोमिलनासाठी आतुर झाले आहेत. यानिमित्ताने



माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनीही प्रसारमाध्यमांकडे आपले मत व्यक्त केले आहे. किशोरी पेडणेकर म्हणाल्या, मुंबईत परप्रांतीय लोक नोकरी व्यवसायासाठी येतात. आम्ही सहिष्णू आहोत. त्यामुळे पोटापाण्यासाठी धंदा करणाऱ्या कोणा परप्रांतीय व्यक्तीला हाकलून लावत नाही. पण आता हेच परप्रांतीय लोक मराठी माणसाच्या डोक्यावर बसू लागले आहेत. गेल्या दोन वर्षात या परप्रांतीयांची दादागिरी प्रचंड वाढली आहे, असे मत पेडणेकर यांनी व्यक्त केले आहे. मागे वळून बघितले तर सगळा चिखलच दिसेलः.परप्रांतीयांची दादागिरी मोडून काढण्यासाठी आता दोन्ही भावांनी एकत्र येणे गरजेचे आहे. दोघांच्या राजकीय भवितव्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी हे मनोमिलन आवश्यक आहे. आम्ही सगळे सकारात्मक आहोत असेही सूचन वक्तव्य त्यांनी केले आहे. आता मागे वळून बघायचे नाही, किती मागे वळून बघितले तर सगळा चिखलच दिसेल. त्यामुळे भविष्याचा विचार करून आता निर्णय घ्यावा लागेल असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे.

## प्लास्टिक संकटाचे आव्हान मोठे

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून चिंता व्यक्त



**पुणे :** 'बदलती जीवनशैली आणि वाढते तंत्रज्ञान यामुळे प्लास्टिकचे संकट हे सध्या मोठे आव्हान आपल्यासमोर असून प्लास्टिकमुळे अनेक प्रजाती नष्ट होत आहेत,' अशी चिंता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुण्यात व्यक्त केली. प्लास्टिकच्या विघटनासाठी संशोधनाला प्राधान्य देऊन त्या दिशेने काम करण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# नीलेश चव्हाण याची येरवडा कारागृहात रवानगी



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ८ : वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात अटकेत असलेल्या नीलेश चव्हाणची येरवडा कारागृहात रवानगी करण्याचे आदेश शनिवारी न्यायालयाने दिले. वैष्णवीची सासू लता, नणंद करिष्मा, पती शशांक यांचे मोबाइल संच चव्हाणकडून जप्त करण्यात आले. चव्हाण आणि आरोपींमध्ये झालेले संभाषण, तसेच संदेशाची तांत्रिक तपासणी करण्यात आली असून, पोलिसांकडून तांत्रिक पुरावे संकलित करण्यात आले आहेत.वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दीर सुशील (वय २७), पती शशांक (वय २७), सासू लता (वय ५४), नणंद करिष्मा (वय ३१) यांना न्यायालयाने यापूर्वी न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर चव्हाण याला शनिवारी शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले.

# नवापूर वनक्षेत्रपाल निलंबित



■ महासागर प्रतिनिधी,
नंदुरबार , दि. ८ : स्वत:च्या खात्यावर शासकीय धनादेश वटवून ठेकेदारांना पैसे देत वित्तीय अनियमितता करणाऱ्या नवापूरच्या वनक्षेत्रपाल स्नेहल अवसरमल यांना धुळे प्रादेशिक वनसंरक्षकांनी निलंबित केले. विशेष म्हणजे वनदिनी वनमंत्र्यांच्या हस्ते अवसरमल यांना सुवर्णपदकाने गौरविण्यात आले आहे. वित्तीय अनियमितता सुमारे एक कोटी १३ लाख रुपयांची आहे.पाच हजार रुपयांपेक्षा अधिक कामांचे ठेकेदारांचे देयक धनादेशाने देण्याचे शासनाचे निर्देश असतांना नवापूरच्या वनक्षेत्रपाल अवसरमल यांनी नवापूर वनक्षेत्र आणि नंदुरबार रोजगार हमी योजनेचा अतिरीक्त कार्यभार सांभाळताना सुमारे एक कोटी १३ लाख रुपये धनादेशाने स्वत:च्या नावावर वटवून घेतले. त्यानंतर रक्कम ठेकेदारांना दिल्याची तक्रार नवापूर वनविभागाच्या माजी रोखपालाने धुळे प्रादेशिक कार्यलयास केली होती. या तक्रारीबाबतच्या तथ्यानंतर धुळे प्रादेशिक वनसंरक्षक निनू सोमराज यांनी तीन समितीय समिती चौकशी स्थापन केली होती.

समितीच्या चौकशीनंतर अवसरमल यांना म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती. अनियमितता आणि निष्काळजीपणाबाबत अवसरमल यांच्याकडून समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले. वनसंरक्षक सोमराज यांनी केलेल्या कारवाईचे स्वागत होत आहे. फेब्रुवारीपासून अवसरमल यांची खात्यातंर्गत चौकशी सुरु असताना त्यांची पुरस्कारासाठी शिफारस का करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## महायुती सत्तेत असताना अडीच वर्षांचा काळ आमच्यासाठी त्रासदायक गिरीश महाजन यांची भावना



**जळगाव :** देवेंद्र फडणवीस याआधी मुख्यमंत्री असतानाचा काळ अत्यंत चांगला होता. मात्र, याआधी महायुती सत्तेत असताना नंतरचा अडीच वर्षांचा काळ आमच्यासाठी खूपच त्रासदायक ठरला, अशा शब्दांत भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले.

# उद्योजक संतोष लड्डा दरोडाप्रकरणी चौघांना पोलीस कोठडी



■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :उद्योजक संतोष लड्डा यांच्या बजाजनगरातील घरात १५ मे रोजी पडलेल्या दरोड्यात साडेपाच किलो सोने व ३२ किलो चांदी चोरून नेल्याप्रकरणाचे धागेदोरे बुधवारी नांदेडशीही असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगरच्या गुन्हे शाखेने गुरुवारी सराफा व्यावसायिकासह चौघांना अटक केली आहे. चारही आरोपींना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्या. जी. डी. गुरुळे यांना ९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.शेख अबुजर उर्फ शाहीद (वय २३), शेख सो-हेल शेख मुस्तफा (२६, रा. दोघेही अंबाजोगाई), शेख शाहरुख शेख रफिक व सराफा व्यावसायिक आशिष जयकुमार बाकलीवाल (वय ४२, दोघेही रा. नांदेड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. आरोपी बाकलीवालकडून १९४.०१० ग्रॅम वजनाची सोने लगड जप्त करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांनी दिली. आरोपीपैकी शाहरूख व अबुजर हे किडुक-मिडूकसोने वितळवून लगड तयार करत असल्याचे शुक्रवारी त्यांना न्यायालयात उभे केले असता वकिलांनी युक्तिवादात सांगितले. बाकलीवा-लसोबतचे तीन्ही आरोपी हे मुख्य आरोपी असलेल्या सुरेश गंगणेचे जवळचे साथीदार आहेत. सुरेश गंगणे याने दरोड्यातील त्याच्या वाटेचे सोने पत्नी बबिता व सासऱ्याला दिले. उर्वरीत सोने सुरेशने अंबाजोगाईतील साथीदार शेख सोहेल याच्याकडे दिले. सोहेलने शेख शाहरुख व शेख अबुजर यांच्या मदतीने सराफा व्यावसायिक आशिष बाकलीवाल याला विकल्याचे चौकशीत सांगितले. त्यावरून पोलिसांनी वरील चौघांना बुधवारी ताब्यात घेऊन छत्रपती संभाजीनगरमध्ये आणले. चौकशीत दरोड्याच्या गुन्ह्याशी चौघांचेही धागेदोरे मिळत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गुरुवारी रात्री अटक दाखवली.

## औंढ्यातील अपहृत व्यक्तीची सुटका; महिलेसह तिघे पोलिसांच्या ताब्यात




**छत्रपती संभाजीनगर :** हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील एका व्यक्तीचे पैशांच्या व्यवहारातून अपहरण करत त्याला बीड जिल्ह्यात आणत असल्याची माहिती दिंद्रुड पोलिसांना शनिवारी दुपारी मिळाली. त्यावरून त्यांनी सापळा रचून अपहरणाचा डाव मोडून काढत एका महिलेसह तिघांना ताब्यात घेतले असून, त्यांना व सुटका केलेल्या व्यक्तीला रविवारी औंढा नागनाथ पोलीस पथकाकडे सोपवण्यात आल्याची माहिती बीड पोलीस विभागाकडून देण्यात आली.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अजित दादांचा 'चेहरा' मान्य होणार का?



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडकरांनी २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलेला विकास, त्यांचा चेहरा (नेतृत्व) नाकारत भाजपला महापालिकेत सत्तेवर बसविले. आता भाजपसोबत राज्यातील सरकारमध्ये सहभागी असलेल्या पवार यांनी आगामी महापालिका निवडणूक आपल्या नेतृत्वाखाली (चेहऱ्यावर) लढविणार असल्याचे सांगितले. त्यामुळे भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी पिंपरी महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची शक्यता बळावली आहे. असे झाल्यास सत्तेतील दोन्ही पक्षात लढत होईल. शहरवासीय पुन्हा अजितदादांचे नेतृत्व (चेहरा) स्वीकारणार कीभाजपलाच दुसऱ्यांदा महापालिकेतील सत्तेत बसविणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# माणसाच्या अस्तित्वासाठी देवराई आवश्यक

## विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे मत



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ८ : 'भोगवादी वृत्तीमुळे निसर्गाचे बरेच नुकसान झाले असून, माणसाच्या अस्तित्वासाठी देवराईचे जाळे वाढणे आवश्यक आहे,' असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी व्यक्त केले.ग्रीन हिल्स ग्रुप या संस्थेतर्फे देवराई फाउंडेशन, सह्याद्री देवराई, वनाई नैसर्गिक शेती फार्म आणि कृषी पर्यटन केंद्र या संस्थांच्या सहकार्याने देवराई संकल्पनेवर आधारित प्रदर्शन आणि प्रकल्पांचा समावेश असलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पुण्याचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते, पर्यावरणसंवर्धन अधीक्षक मंगेश दिघे, ग्रीन हिल्स ग्रुपचे सदस्य अतुल वाघ, देवराई फाउंडेशनचे रघुनाथ ढोले, भूजल विज्ञान शास्त्रज्ञ उपेंद्र धोंडे, देववन संकल्पनेचे किशोर मोहोळकर, जेहलम जोशी, वनाई नैसर्गिक शेती फार्म व कृषी पर्यटन केंद्राचे सहसंचालक अथर्व वेताळ आणि सह्याद्री देवराईच्या स्मिता जगताप या वेळी उपस्थित होत्या. बालगंधर्व कलादालन येथे सोमवारपर्यंत (९ जून) सकाळी नऊ ते रात्री आठ या वेळात खुल्या असलेल्या या प्रदर्शनात अतुल वाघ यांनी टिपलेली छायाचित्रे आणि जगातल्या देवराईबद्दल माहिती देणाऱ्या भित्तिपत्रकांचा समावेश आहे. घनवन संकल्पनेद्वारे आपल्या शेतात वृक्षारोपण करून शेतीसह परिसराचा कायापालट करून आर्थिक विकास साधलेल्या शेतकऱ्यांची यशोगाथा ऐकण्याची संधी या प्रदर्शनाद्वारे मिळणार आहे

# सांडपाणीमुक्त पवई तलावासाठी लढा सुरूच

## मूक साखळी रद्द, तरीही नागरिकांचा निर्धार कायम



**मुंबई :** पवई तलावात सांडपाणी मिसळण्याच्या विरोधात रविवारी आयोजित करण्यात आलेली मूक मानवी साखळी अंतिम क्षणी रद्द करण्यात आली. पोलिसांची परवानगी मिळाल्यानंतरही महानगरपालिकेने आवश्यक 'ना-हरकत प्रमाणपत्र' न दिल्यामुळे ही साखळी आयोजित करता आली नाही. तरीदेखील तलावाचे प्रदूषण थांबवण्यासाठी स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणप्रेमींनी आपला लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# बाल लैंगिक अत्याचार गुन्ह्यातील आरोपीला २० वर्षाचा तुरुंगवास



■ महासागर प्रतिनिधी,
कल्याण, दि. ८ : डोंबिवलीतील एका सतरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती ठेवणाऱ्या एका ३९ वर्षाच्या इसमाला कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील विशेष बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक न्यायालयाचे (पॉक्सो) विशेष न्यायाधीश ए. डी. हर्णे यांनी कठोरात कठोर २० वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. जीवन अशोक वाडविंदे (३९) असे बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याने (पॉक्सो) दोषी ठरलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणात सरकार पक्षाच्यावतीने विशेष सरकारी महिला वकील ॲड. भामरे-पाटील, विशेष सरकारी महिला वकील ॲड. जे. आर. भटिजा यांनी, आरोपीतर्फे ॲड. विनोद गरूड यांनी काम पाहिले.न्यायालयाने याप्रकरणात आरोपीला २० हजार रूपयांचा दंड ठोठावला. यामधील १८ हजार रूपये पीडितेच्या कुटुंबीयांना भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने यासंदर्भात योग्य कार्यवाही करण्याचे न्यायालयाने सूचित केले.पोलिसांकडून न्यायालयात दाखल प्रकरणातील माहिती अशी, की पीडित मुलगीच्या आईचा आरोपी जीवन अशोक वाडविंदे हा नातेवाईक आहे. या नाते संबंधातून जीवन वाडविंदे पीडित मुलीच्या घरी यायचा. जुलै २०२० मध्ये आरोपी जीवन वाडविंदे पीडित मुलीच्या घरी दोन दिवस पाहुणा म्हणून राहण्यास होता. रात्रीच्या वेळेत कुटुंबीय झोपी गेल्यानंतर आरोपी जीवन वाडविंदे याने घरातील एका खोलीत झोपी गेलेल्या सतरा वर्षाच्या पीडित मुलीशी मध्यरात्री दीडच्या सुमारास जवळिक साधली.

तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. आरोपी जीवन वाडविंदे याने पीडितेला तु जर या विषयी कोणाला काही सांगितले तर मी तुझी समाजात बदनामी करीन, अशी धमकी दिली. जीवनकडून आपली समाजात बदनामी होईल. या भीतीने घडलेला प्रकार पीडितेने आपल्या कुटुंबीयांना सांगितला नाही. एक महिन्यानंतर पीडितेला उलट्या सुरू झाल्या. पीडितेच्या आईने रुग्णालयात नेऊन तिची वैद्यकीय चाचणी केली. त्यावेळी आपली मुलगी गर्भवती असल्याचे तिच्या निदर्शनास आले. या प्रकारानंतर पीडितेने आपल्या बाबतीत जीवन वाडविंदे यांने जो प्रकार केला तो घरात सांगितला.

महासागर
वर्धा
सोमवार, ०९ जून २०२५
पान ३

## शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. ०८ जून**

शहरातील संत तुकडोजी वॉर्ड, मोहता बगीतचा परिसरात शुक्रवारी पुन्हा दिवसाढवळ्या चोरीच्या दोन घटना घडल्या, लेबर कंत्राटदार प्रमोद पाटील यांच्याकडे शुक्रवार, ६ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली, मिळालेल्या माहितीनुसार,

चोरटयांनी कुणी नसल्याची संधी साधून साडेतीन तोळे सोन्याचे दागिन्यासह ७० हजार रोख रकमेवर हात साफ केला, याच परिसरात गोटे यांच्याकडील दोन चांदीचे शिक्के व ३ हजार ५०० रुपये रोख लांबविले, मनिष गोटे हे पंचायत समिती येथे कार्यरत आहे, त्यांच्या घरी कुणी नसल्याने चोरटयांनी हात साफ केला, असे सांगण्यात येते, काही दिवसांपुर्वी शहरातील तुकडोजी वॉर्ड भागात ३१ मे रोजी चार ते पाच चोरीच्या घटना घडल्या असताना शुक्रवारी पुन्हा दोन घटना घडल्याने पोलिसांपुढे आव्हान उभे ठाकले आहे, डॉग स्कॉड पथक दाखल झाले मात्र, चोरटयांचा सुगावा लागला नाही.

## आमदार दादाराव केचे यांचा दणका...

❒ बांधकाम विभागाचे अधिकारी पोहचले रस्त्यावर ❒ व्दिभाजक होणार दिड मिटरचाच



**महासागरप्रतिनिधी**
**आर्वी, दि. ८ जून**

स्वत:च्या लाभाकरीता आमदाराचा हवाला देवुन व्दिभाजाकाची रुंदी दोन फुट कमी करण्याचा भाजपासोबत सलगी साधुन असलेल्या समाजकंटकाचा इरादा आमदार दादाराव केचे यांच्या दणकयाने रसातळाला पोहचला. केंद्रीय बांधकाम विभागाचे बडे अधिकारी रविवारी (ता.आठ) येथे पोहचले आणी त्यांनी महामार्गावरील व्दिभाजक दिड मिटरचेच राहील असे कंत्राटदाराला ठणकावुन सांगीतल्याने नागरिकांनी सुटकेचा स्वास सोडला.

केंद्रीय महामार्ग बांधकाम विभागाने रस्त्याच्या बांधकामाकरीता प्रोजेक्ट तयार केलेले आहे. त्याच प्रोजेक्टप्रमाणे बांधकाम व्हायला पाहिजे असा नियम आहे. आवश्यक असतांना परिस्थीती पाहुन यात बदल करण्याची सुट सुध्दा आहे. याच नियमाप्रमाणे आर्वी शहराच्या मध्यभागातुन जाणाऱ्या चार किलो मिटर रस्त्यावर एक मिटरचे व्दिभाजक निर्माण करण्याची तरतुद आहे. कंत्राट देतांना बांधकाम विभागाने तसा करारनाम सुध्दा करुन घेतला. मॉडेल हायस्कुल कडून करण्यात आलेल्या बांधकामात याचे पुर्णपणे पालन केल्या गेले. मात्र पुढे भाजप पदाधिकाऱ्याच्या झोपडी पुढील व्दिभाजकाची रुंद दोन फुटाने कमी करुन अचानक एका फुटावर आणली आणी खळबळ माजली. कंत्राटदाराने बांधकाम सुरू करण्याकरीता आखणी सुध्दा केली मात्र याची माहिती नागरिकांच्या माध्यमातुन आमदार दादाराव केचे यांच्यापर्यंत पोहचली. त्यांनी कामाची पाहणी करुन कंत्राटदारासह बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. स्वत: हातात सबल घेवुन कामा करीता लावलेले लोखंडी गडर उखडून काढले आणी व्दिभाजक दिड मिटरचाच करण्यात यावा अशी ठाम भुमीका घेतली.

यामुळे कंत्राटदारासोबतच बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ माजली. केंद्रीय महामार्ग बांधकाम विभाग नागपुरचे कार्यकारी अभियंता जगताप व कनिष्ठ अभियंता नाबील खान रवीवारी (ता.आठ) येथे पोहचले आणी त्यांनी कामाची पाहणीकरुन आमदार दादाराव केचे यांच्या सोबत संवाद साधला.

### आमदारांच्या सुचनेप्रमाणेच व्दिभाजकाचा निर्णय

या मार्गावर असलेल्या ३८ झाडांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता असल्याने व्दिभाजकाची रुंदी कमी करण्याचा निर्णय घेतला होता अशी माहिती केंद्रीय महामार्ग बांधकाम विभाग नागपुरचे कार्यकारी अभियंता जगताप यांनी देवुन आमदार दादाराव केचे यांच्या सुचने प्रमाणेच व्दिभाजकाच्या बांधकामाचा निर्णय घेण्यात येईल असे सांगीतले.

### झोपडीपुढेच झाडाचा प्रश्न? टकल्या नारदाचे दुष्कृत्य

तळेगाव (शा.पं.)- आर्वी महामार्गचे बांधकाम शेवटल्या टप्प्या पर्यंत पोहचले. या दरम्यान अनेक झाडे रस्त्याला अडथळा निर्माण करीत उभी आहेत. मॉडेल हायस्कुल कडुन शिवाजी पुतळ्यापर्यंचा रस्ता झाला या दरम्यान सुध्दा वाहतुकीला अडथळा निर्माण करत झाडे उभी असतांना व्दिभाजकाची रुंदी कमी करण्याची बुध्दी अभियंत्यांना सुचली नाही. मात्र झोपडी पुढे काम सुरू होताच झाडांच्या अडथळ्याचा प्रश्न? कसा काय निर्माण झाला. आणी व्दिभाजकाची रुंदि कमी करण्याचा निर्णय कसा घेण्यात आला. हा कळीचा प्रश्न? नागरिकांच्या मनात निर्माण झाला असुन यातील टकल्या नारदाचे तर दुष्कृत्य नाही ना? असे हि बोलल्या जात आहे.

### झाडे तोडण्याची परवानगी घेण्याकरीता प्रयत्न करणार

झाडांचा बहाणाकरुन आपली चुक लपविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांना ' व्दिभाजक दिड मिटरचाच करण्यात यावा असे आमदार दादाराव केचे यांनी ठणकावुन सांगीतले तसेच अडथळा निर्माण करणारी झाडे तोडण्याची न्यायालयाच्या माध्यमातुन परवानगी घेण्याकरीता प्रयत्न करणार असल्याची माहिती दिली.

## किस्सा अमरावती जिल्ह्यातील किर्ती बार वरील

❒ शांत शहराला लागली राजकीय नजर, ❒ झाल्या गटबाज्या, होवु लागली भांडणे
❒ माजी नगर सेवकांवर लपुन बसण्याची आली पाळी तर, एक झाला जबर जखमी





**महासागरप्रतिनिधी**
**आर्वी, दि. ८ जून**

जिल्ह्यातच नव्हे तर अख्या महाराष्ट्रात शांत म्हणुन गणल्या गेलेल्या शहराला राजकीय नजर लागल्याने मोठ्या प्रमाणात गटबाज्या निर्माण झाल्या असुन याचे पर्यावसन जिव घेण्या भांडणात होवु लागले आहे. नुकतेच अमरावती जिल्ह्यातील किर्ती बारवर किरकोळ करणावरुन झालेल्या भांडणात नगर परिषदेतील भाजपच्या गट नेत्यावर शेतात तर, माजी नगर सेवकाला पुलाखाली तोंड लपवुन बसण्याची पाळी आली. यात एक युवक सुध्दा जबर जखमी झाला असुन सुधीर गुल्हाणे यांच्या वाहनाची सुध्दा तोडमोड झाली आहे.

प्रमोद घोडेस्वार असे जखमी तरुणाचे नाव असुन तो येथील मायबाई वार्डाचा रहिवासी आहे. तो आपल्या दोन मित्रांसोबत अमरावती जिल्ह्यातील कुऱ्हा लगतच्या किर्तीबारवर गेला होता. याच ठिकाणी भाजपचे माजी नगरपालीका उपाध्यक्ष तथा गटनेते प्रशांत ठाकुर, माजी नगरसेवक सुधीर टाके, अल्पसंख्याक सेलचे शेख युनूस शेख रशिद, बाजार समितीचे अडते दाऊदपुरे आदि भाजपाचा कंपु नेहमी प्रमाणे तेथे पोहचला त्यांनी येथेच्छ दारु ढोसली आणी बाहेर निघाले तर त्यांना प्रमोद घोडस्वार बसलेला दिसुन आला. प्रशांत ठाकुर व त्यांच्यात नगर परिषदेच्या बांधकामावरुन किरकोळ बाचाबाची सुरू झाली अशात मध्यधुंद असलेल्या सुधीर गुल्हाणे या माजी नगर सेवकाने, प्रमोद घोडेस्वार याला धक्का दिला. प्रकरण हात घाईवर पोहचल. गुल्हाणे याने तेथीलच खुर्ची उचलुन घोडेस्वार याच्या डोक्यावर मारली यात तो जखमी झाला.

यानंतर भाजपाचा कंपु कारने पळण्याच्या तयारीत असतांनाचा प्रमोद घोडेस्वार याचे दहाबारा मित्र तेथे पोहचले. त्यांनी प्रशांत ठाकुर, सुधिर टाके व शेख युनूस करीत असलेल्या शेख युनूस शेख रशिद याला विनाकारणच मार खावा लागला. त्याने सुध्दा पलायन केले तर, दाऊतपुरे तत्पुर्वीच एका दुचाकीवर बसुन पसार झाला. शेख युनूस याने भ्रमणध्वनीवरुन याची माहिती नातेवाईकांना दिली. तिन चार गाड्याभरुन ३० ते ४० लोक किर्तीबारवर गेले तो पर्यंत जखमी प्रमोद घोडेस्वार व त्याचे साथीदार येथील पोलीस स्टेशन मध्ये पोहचले होते.

शेख रशिद यांची येथेच्छ धुलाई सुरू केली. यांच्या हातुन प्रशांत ठाकुर याने प्रथम सुटका करुन लगतच्या शेतात पलायन केले. तर, सुधीर गुल्हाणे, गोटे व लाथाबुक्यांचा मार सहन करत पुलाखाली जावुन दडला. हे भांडण थांबवीण्याचा प्रयतन

### आमदार सुमीत वानखेडे यांच्या नावामागे लपण्याचा प्रयत्न

भांडणा नंतर भाजपचा कंपु व त्यांचे साथीदार अमरावती जिल्ह्याच्या पोलीस स्टेशन मध्ये पोहचले प्रशात ठाकुर यांने तक्रार देतांना प्रमोद घोडेस्वार याने आमदार सुमीत वानखेड यांना शिव्या दिल्यामुळे भांडण झाल्याची माहिती देवुन त्यांच्या पाठीमागे दडण्याचा प्रयत्न केल्याचे कळते.

### दोन्ही पार्टीवर गुन्हा दाखल, तपास सुरू

या प्रकरणी प्रमोद घोडेस्वार यांने प्रशांत ठाकुर व सुधीर गुल्हाणे यांच्या विरोधात आर्वी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली असुन ती पुढील कारवाई करीता कुऱ्हा पोलीस स्टेशन कडे रवाना करण्यात आली होती यात प्रशांत ठाकुर व सुधीर टाके यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर प्रशांत ठाकुर यांनी सुध्दा कुऱ्हा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे. दोन्ही प्रकरणी तपास सुरू आहे.

### कुऱ्हा पोलीस स्टेशनला फोन करणारा आमदार की कार्यकर्ता

आमदार सुमीत वानखेडे यांच्या कार्यालयीन कार्यकर्त्यांना या प्रकरणाची माहित मिळाली. लगेच कुऱ्हा पोलीस स्टेशनचा फोन घणघणला, संपर्क साधल्या गेला, मी आमदार सुमीत वानखेडे बोलतो. माझ्या कार्यकर्त्यांविरुध प्रमोद घोडेस्वार नावाचा व्यक्ती तक्रार देण्याकरीता येत आहे त्याची तक्रार नोंदवून घेवु नका अशी तसदी मिळाल्याची माहिती कर्तव्यावर असलेल्या एका पोलीस कॉन्स्टेबलने आमच्या प्रतिनिधीला दिली. मात्र भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधणारा हा आमदार की कार्यकर्ता? असा प्रश्न त्यांना पडला आहे.

## शेतक-याचा हदयविकाराने मृत्यू

**वर्धा, :** खरिपाकरिता शेतीच्या मशागतीचे लगबग सुरू आहे, अशातच शेतात वखरणी करीत असताना युवा शेतक-याच्या हदयविकाराचा तीव्र झटका आला, त्याला तातडीने रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. ही घटना देवळी तालुक्यातील सोनेगाव (बाई) येथे घडली. मनोज वाल्मीक नाईक (वय ३९रा. सोनेगाव बाई) असे मृताचे नाव आहे, नेहमीप्रमाणे सकाळी ते स्वत:च्या शेतात कामाला गेले होते, वखरणी सुरू असताना अचानक त्यांना हदयविकाराच्या झटका आल्याने खाली पडले, परिवारातील सदस्यांनी त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात हलविले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले, सांयकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या अचानक मृत्यूने परिवार उघडयावर आला आहे, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे.

## विजयगोपाल येथे जुगारावर छापा

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ८ जून**

पुलगाव पोलिसांनी विजयगोपाल येथे छापा टाकुन दहा जुगा-यांच्या ताब्यातुन पोलिसांनी ४४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**४४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

विजयगोपाल येथे तास पत्याचा जुगार सुरु असल्याचे आणि पैशाची हारजीत केली जात असल्याची माहिती पुलगाव पोलिसांना मिळाली, त्यानंतर पोलिसांनी विजयगोपाल गाठून जुगारी गौतम, अतुल, नानाजी, शंकर, किशोर, अवसरे, मनोहर, केवद, गजानन, अनिल सर्व रा. विजयगोपाल यांना ताब्यात घेतले, त्याच्याकडून पोलिसांनी रोख १० हजार ५०० रुपये व सहा मोबाईल, असा एकुण ४४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, शिवाय संबंधितांवर पुलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना जामिनावर सोडण्यात आले आहे.

## शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत वृध्दाचा मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**
वर्धा, दि. **दि. ८ जून**

कुलरमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे घराला आग लागली. यात कुलरजवळ झोपलेल्या वृध्दाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी पहाटे ३.३०वाजताच्या सुमारास शहरातील समतानगर भागात घडली. ही घटना उघडकीस येताच सर्वत्र खळबळ उडाली. आगीमध्ये पंजाब तामगाडगे हे गंभीररित्या जळाल्याने ते गतप्राण झाले.

मृतकाचे नाव पंजाब डोमाजी तामगाडगे (९२)असे आहे. प्रमोद पंजाब तामगाडगे यांचे समतानगरात घर आहे. दुमजली असलेल्या या घरातील पहिल्या माळ्यावर प्रमोद परिवारासह राहत होते. तर दुस-या माळ्यावरील एका खोलीत मृतक पंजाबराव राहायचे. पंजाबराव हे कुणाची मदत घेतल्याशिवाय चालू शकत नव्हते. ६ जून रोजी पहाटे ३.३०वाजता दरम्यान कुलरमध्ये अचानक शॉर्टसर्किट झाल्याने खोलीत आग लागली. ही घटना लक्षात येईपर्यंत त्या खोलीत ठेवून असलेल्या वस्तु भक्ष्यस्थानी आले. घटनेची माहिती नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहचून त्यांनी आगीवर नियंत्रण ठेवले. वृध्द पंजाब हे गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती शहर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनासथळ गाठून प्राथमिक तपास पूर्ण करीत मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता ताब्यात घेतला. प्रमोद तामगाडगे यांच्या माहितीवरुन शेहर पोलिसांनी घटनेची नोंद केली असुन पुढील तपास सुरु आहे.

## हत्तीरोग दिनानिमित्त रुग्णांना साहित्य वाटप

**हिंगणघाट, :** जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. नलिनी विखे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीणा मिसार, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर नाईक यांच्या मार्गदर्शनात येथे हत्तीरोग दिनानिमित्त हत्तीरोग रुग्णांना साहित्याचे वाटप करण्यात आले, स्थानिक महावीर वॉर्ड येथील आरोग्य केंद्रात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा लांबट होत्या, यावेळी त्यांनी रुग्णांना सदर कार्यक्रमाविषयी माहिती देऊन काळजी घेण्याचे आवाहन केले,

## हिंगणघाट बाजार समिती नागपूर विभागात पुन्हा अव्वल

पालकमंत्री भोयर यांनी केला सभापती ॲड. कोठारी यांचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जून**

स्व. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याबद्दल हिंगणघाट बाजार समितीला नागपूर विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून बाजार समितीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हिंगणघाट बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी याचा शनिवारी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शाल श्रीफळ देत सत्कार केला

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीने सहकार क्षेत्रात दैदिप्यमान यशाची परंपरा नेहमीच कायम राखली आहे. विदर्भातील सर्वोत्कृष्ट बाजार समिती म्हणून हिंगणघाट बाजार समिती नावारूपास आलेली आहे. उत्कृष्ट कार्य व शेतकरी हितावह योजना राबविण्यात बाजा समिती नेहमी अग्रेसर राहिली आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याबद्दल हिंगणघाट बाजार समितीला नागपूर विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून बाजार समितीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हिंगणघाट बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांच्या कुशल नेतृत्वामुळे हा मान मिळाला आहे. राज्य शासनाच्या सहकार विभागातंर्गत स्व. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत सन २०२३-२४ राबविण्यात आला होता. प्रकल्पा अंतर्गत पायाभूत सुविधा व इतर सेवा, आर्थिक निकष, वैधानिक कामकाज निकष व इतर निकष यावर आधारीत मूल्यांकन करण्यात आले होते. हिंगणघाट बाजार समितीला नागपूर विभागातून चार ही गटात सर्वाधिक गुण मिळाले आहे. बाजार समिती ने १७८ गुण प्राप्त करून नागपूर विभागातून प्रथम क्रमांक स्थान प्राप्त केले आहे.

### पालकमंत्री भोयर यांनी केली ॲड. कोठारींचा सत्कार

हिंगणघाट बाजार समितीने आपली यशाची व सुधारणांची परंपरा कायम ठेवल्या बद्दल पालकमंत्री तथा राज्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सभापती ॲड. सुधिरबाबू कोठारी यांच्या कार्याची यावेळी प्रशंसा केली. बाजार समितीने शेतक-यांसाठी सुरू केलेल्या योजना व कार्याबद्दल माहिती जाणून घेत शेतक-यांना आणखी चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना करून सहकार्य करण्याची हमी दिली. यावेळी भाजपाचे शहर अध्यक्ष निलेश किटे उपस्थित होते.

### राज्यातील सर्वाधिक गुण हिंगणघाट बाजार समितीला

स्व. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राज्यातील प्रत्येक विभागातंर्गत् राबविण्यात आला होता. यामध्ये नागपूर, अमरावती, छत्रपजी संभाजी नगर, लातमर, पुणे, कोल्हापूर, नाशिक व कोकण विभागाचा समावेश होता. अमरावती विभागातील वाशिम, छत्रपती संभाजीनगर, लातूर विभागात लातूर, नाशिक विभागात लासलगांव, पुणे विभागात बारामती सांगली विभागात आटपाडी, कोकण विभागात भिवंडी बाजार समितीला प्रथम कमांक मिळाला आहे. मात्र यापैकी एकाही बाजार समिती ने हिंगणघाट बाजार समिती पेक्षा अधिक गुण घेतले नाही, हे विशेष. गुणानुक्रमे हिंगणघाट बाजार समिती राज्यात देखील प्रथम राहिली आहे.

## रासयनिक खताची कमतरता पडू देणार नाही

### जिल्हा कृषी विकास अधिकारी बमनोटे



**महासागर प्रतिनिधी**
**समुद्रपूर, दि. ०८ जून**

जिल्हा सध्या युरीयाचा तुटवडा निर्माण झाला असून शेतक-यांना तातडीने युरीया खत उपलब्ध करुन देण्याची मागणी सरपंच संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे, या मागणीची कृषी विभागाकडून तात्काळ दखल घेतली असून शेतक-यांनी कोणत्याही परिस्थितीत खताची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही जिल्हा कृषी अधिकारी संजय बमनोटे यांनी दिली आहे,

सध्या शेतक-यांचा खरीपाचा हंगाम जोरात सुरू असून या काळात ज्या शेतकयांच्या बांधावर पाऊस सुरू झाला की कोणतेही वाहन जात नाही, अशा शेतक-यांची रासायनिक खतासाठी लगबग सुरू आहे, मात्र, अशा वेळी अनेक शेतकरी रासायनिक खतासाठी भटकंती करीत आहे, अश स्थितीत शेतक-यांनी आपल्या परिसरातील कोणत्या कृषी केंद्रात खताचा कोणता साठा किती प्रमाणात उपलब्ध आहे, याची माहिती जाणून घेण्यासाठी सर्व शेतक-यांनी आपल्या मोबाईलमध्ये कृषक ॲप डाऊनलोड करून यात चावडी फोल्डर उघडून सर्व प्रकाराची माहिती जाणून घ्यावी, अशा परिस्थितीत एखाद्या कृषी सेवा केंद्र संचालककाकडे रासायनिक खताचा साठा उपलब्ध असताना तो देण्यात टाळाटाळ करीत असल्यास यासंबंधी तात्काळ कृषी विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी केले आहे.

जिल्ह्यात १८ हजार मेट्रिक टन युरिया उपलब्ध असल्याचे पॉश मशीनमध्ये दिसत आहे. युरियाचा पुरवठा कमी आहे. मात्र स्थानिक पातळीवर काय परिस्थिती आहे याची तपासणी कृषी विभागाच्यातीने करण्यात येईल. शेतक-यांना कोणत्याही रासयनिक खताची कमतरता पडू देणार नाही. तसेच ५ते६ दिवसात जिल्ह्यात युरियाचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभाग सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. अशी माहिती जिल्हा कृषी विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी दिली आहे.

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा

वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे सावित्री नावाचे महाकाव्य लिहिले आहे.



वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.


सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे, अशी प्रार्थना करतात.

सण आहे सौभाग्याचा, बंध आहे अतूट नात्याचा ।
या शुभदिनी पूर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा ।।
वट पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रविण बागडे, नागपूर
मो.नं. ९९२३६२०९१९
ई-मेल
pravinbagde@gmail.com

# डॉ. पीएसजी कुमार: ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्रात अतुलनीय योगदान




**(डॉ. पीएसजी कुमार जयंती विशेष ९ जून २०२५)**

ग्रंथालयांशिवाय शिक्षण क्षेत्राचे अस्तित्व अशक्य आहे, कारण ग्रंथालयांना शिक्षणाचा पाया म्हणतात आणि दर्जेदार ग्रंथालये ही एका मजबूत शिक्षण व्यवस्थेचा आधार आणि प्रतिबिंब आहेत. ग्रंथालयांचा चांगला विकास हा उज्ज्वल भविष्याचा पाया रचतो. जेव्हा आपण देशातील ग्रंथालयांच्या विकासाबद्दल बोलतो तेव्हा आपल्याला निश्चितच त्या महान व्यक्तींची आठवण येते ज्यांनी या क्षेत्रात मोलाची कामगिरी पटकावली. आज आपण अशाच एका महान व्यक्तीबद्दल बोलत आहोत ज्यांनी आपल्या असाधारण कार्याद्वारे ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्राला नवीन उंचीवर नेले आहे. डॉ. पीएसजी कुमार, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्राच्या विकासासाठी समर्पित केले. ज्यांना देशात या क्षेत्रासाठी आदर्श म्हणून पाहिले जाते. त्यांनी देशात महत्त्वाच्या पदांवर काम केले आणि परदेशात विविध प्रसंगी भारताचे प्रतिनिधित्व देखील केले. देशभरातील ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे स्वप्न होते की डॉ. पीएसजी कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करून काहीतरी शिकावे. लोक त्यांना ग्रंथालय माहिती विज्ञानाचा विश्वकोश म्हणतात. ते गुणांचे खजिना होते. ग्रंथालय क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान आणि त्याच्या विकासाशी संबंधित कार्यपद्धती त्यांच्या मनात कोरली होती.

त्यांच्या उत्कृष्ट योगदानामुळे आणि दर्जेदार कार्यामुळे, डॉ. पीएसजी कुमार यांना ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एसआर रंगनाथन यांच्या समतुल्य मानले जाते. डॉ. पीएसजी कुमार यांनी त्यांचे बहुतेक कार्यकाळ नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभागात घालवले. ते अनेक गोष्टीत प्रतिभावान होते, विचारशील, बुद्धिमान, मृदुभाषी, वक्तशीर आणि कामासाठी नेहमीच तत्पर. एक प्रतिभावान संशोधक, वैज्ञानिक दृष्टिकोन, कामात पद्धतशीर, व्यवस्थापनात कार्यक्षम, लोकांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मानवतावादी, निर्णय घेण्यास तार्किक, अडचणी हाताळण्यात मेहनती आणि प्रामाणिक, एक चांगला शिक्षक, आदर्श ग्रंथपाल, उत्तम संघटक, सक्षम प्रशासक, कुशल मार्गदर्शक, उत्कृष्ट लेखक, वक्ता आणि समीक्षक सारख्या अनेक भूमिकांमध्ये ते पारंगत होते.

डॉ. पीएसजी कुमार यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड प्रसिद्धी मिळवली. त्यांना युनेस्को, एफआयडी, आयएफएलए तर्फे फेलोशिप ने सन्मानित केले. एबीसी केंब्रिजकडून इंटरनेशनल मैन ऑफ द ईयर, एबीआय, यूएसएकडून मैन ऑफ द ईयर, सेक्युलर इंडिया हार्मोनी अवार्ड, पंजाब विद्यापीठाकडून सत्ताल पंजाब ग्रंथपाल पुरस्कार, पी.एस. तेलुगू विद्यापीठ, हैदराबाद तर्फे प्रो. पी. गंगाधर राव पुरस्कार, कौला एंडोमेंट फॉर लायब्ररी सायन्सकडून रंगनाथन कौला पुरस्कार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून एमेरिटस फेलो देखील मिळाले. त्यांनी आयएफएलए (इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन) च्या निमंत्रणावरून यूके, यूएसए, मॉरिशस आणि फ्रान्सला भेट दिली आणि परिषदांमध्ये भाग घेतला, फीड (इंटरनॅशनल डॉक्युमेंटेशन फेडरेशन), कॉमला (कॉमनवेल्थ लायब्ररी असोसिएशन), एएलए (अमेरिकन लायब्ररी असोसिएशन) यामुळे त्यांचे आंतरराष्ट्रीय संपर्क वाढले होते. त्यांनी देशातील जवळजवळ सर्व राज्ये आणि विद्यापीठांना भेटी दिल्या. ते ७७ हून अधिक विद्यापीठांशी जुडून होते आणि त्यांनी विविध संस्था/विद्यापीठांमध्ये १६८ हून अधिक व्याख्याने दिली. त्यांचे चरित्रात्मक प्रोफाइल १६ हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय चरित्रात्मक स्त्रोतांमध्ये प्रकाशित झाले.

त्यांनी भारत आणि परदेशातील प्रसिद्ध संशोधन जर्नल्सच्या संपादकीय मंडळांवर काम केले. त्यांच्या कार्यकाळात, डॉ. कुमार यांनी अनेक संस्था आणि संघटनांमध्ये महत्त्वाची पदे भूषवली. ते विदर्भ शैक्षणिक ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष होते, भारतीय ग्रंथालय आणि माहिती विज्ञान शिक्षक संघटनेचे सरचिटणीस, उपाध्यक्ष आणि अध्यक्ष होते, केंद्रीय शिक्षण आणि प्रशिक्षण विभागीय समितीचे अध्यक्ष, १९९०-९६ मध्ये भारतीय ग्रंथालय संघटनेचे उपाध्यक्ष आणि अध्यक्ष, इंडियन असोसिएशन ऑफ स्पेशल लायब्ररीज अँड इन्फॉर्मेशन सेंटर्सचे दोन वेळा कौन्सिल सदस्य व अध्यक्ष, सार्क देशांचे ग्रंथालय संघ, गुड ऑफिसेस कमिटी, संयुक्त भारतीय ग्रंथालय संघटनांचे परिषद आणि भारतीय ग्रंथालय आणि माहिती सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष म्हणून, त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे. त्यांनी भारतातील ग्रंथालय व्यवसायाच्या विकासात अमूल्य योगदान दिले. डॉ. कुमार यांनी २००४ मध्ये विदर्भ ग्रंथालय संघटनेची स्थापना केली आणि तरुण व्यावसायिकांना त्यांचे सर्जनशील कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ग्रंथालय माहिती विज्ञान विभागप्रमुख, ग्रंथपाल आणि व्याख्याता देखील होते. त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव पद देखील भूषवले. डॉ. पीएसजी कुमार यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने ग्रंथालय आणि माहिती विज्ञान क्षेत्रात एमेरिटस फेलोशिप देऊ केली होती. ही फेलोशिप भारतातील ग्रंथालय चळवळ आणि राज्यनिहाय विकास या विषयावर संशोधन करण्यासाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी होती.

डॉ. पीएसजी कुमार यांनी ११८ हून अधिक संशोधन लेख, विविध जर्नल्समध्ये ६८ चर्चासत्र पेपर्स, ७९ हून अधिक पुनरावलोकने, १२ प्रस्तावना, ३ तांत्रिक नोट्स लिहिले, विविध विषयांवर ६० हून अधिक पुस्तके प्रकाशित केली (इंडियन एन्सायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स (२३ खंडांमध्ये) जे त्यांनी संपादित केले ते वगळता), ते ८ हून अधिक व्यावसायिक जर्नल्सशी संपादक व संपादकीय मंडळ सदस्य म्हणून संबंधित होते. यापैकी महत्त्वाचे म्हणजे आयएटीएलआयएस कम्युनिकेशन्स, आयएलए बुलेटिन, आयएलए न्यूजलेटर, हेराल्ड ऑफ लायब्ररी सायन्स अँड इन्फॉर्मेशन एज. आयएलए द्वारे स्वरूप, मांडणी आणि आशयाची पुनर्रचना करून त्यांनी आपली संपादकीय क्षमता सिद्ध केली. 'लायब्ररीज इन इंडिया सिरीज' आणि 'इंडियन एन्सायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' हे २३ खंडांमध्ये प्रकाशित झालेले त्यांच्या ज्ञान आणि लेखन कौशल्याचे प्रतीक आहेत. डॉ. पीएसजी कुमार यांनी 'माहितीयुग' हे त्रैमासिक मासिक मराठीत आणि 'इन्फॉर्मेशन एज' हे इंग्रजीत सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याला अल्पावधीतच राष्ट्रीय कीर्ती मिळाली.

डॉ. कुमार यांच्या अथक प्रयत्नांमुळेच विदर्भात ग्रंथपालांसाठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू झाला. मोठ्या प्रयत्नांनी त्यांनी १९८४ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात एमएलआयएससी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू केली. देशातील त्यांच्या समकालीन लोकांमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट पदवीधारकांची संख्या सर्वाधिक होती. त्यांनी ग्रंथालय विज्ञानाच्या जगाशी संबंधित विविध विषयांवर लेखन सुरू ठेवले. ग्रंथालय विज्ञानाचे असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यावर त्यांनी लिहिले नाही. डॉ. कुमार यांच्यावर पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांचा सर्वाधिक प्रभाव होता, ज्यांना भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हटले जाते. ते अनेक प्रकारे डॉ. रंगनाथन यांचे कट्टर अनुयायी होते आणि त्यांची कर्तव्ये पार पाडताना ते पूर्ण अलिप्ततेचा संदेश देत असत.


रंगनाथन यांच्यानंतर, प्रा. पी.एन. कौला यांचा सर्वात जास्त प्रभाव होता, कौला त्यांना मुलगा मानत होते आणि प्रोत्साहनाचा स्रोत देखील मानत.

डॉ. पीएसजी कुमार यांनी १९७२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय माहिती विज्ञान विभागाची जबाबदारी स्वीकारली आणि त्यांनी त्यांच्या कार्यशैलीने या विभागाला राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळवून दिली. आज त्यांचे विद्यार्थी देश-विदेशातील मोठ्या शैक्षणिक संस्थांमध्ये सर्वोच्च पदांवर काम करत आहेत. डॉ. पीएसजी कुमार यांच्या कार्याचा प्रत्येक पैलू आपल्याला काहीतरी नवीन शिकण्याची प्रेरणा देतो. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक संग्रहातील पुस्तकांची मौल्यवान भांडवल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या ग्रंथालयाला दान केली. ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयावर स्थापनेसाठी आणि व्याख्यानांसाठी त्यांनी नागपूर विद्यापीठाला एक लाख रुपये दान केले. त्यांच्या कार्यापासून प्रेरित होऊन डॉ. पीएसजी कुमार ग्रंथालय फाउंडेशनची स्थापना झाली आहे. ग्रंथालय माहिती विज्ञान या विषयाच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी ते आयुष्यभर परिश्रमी आणि कष्टाळू राहिले, हा वारसा अधिक चांगल्या प्रकारे पुढे नेणे आपले कर्तव्य आहे. देशातील ग्रंथालय माहिती विज्ञानाशी संबंधित कोणत्याही परिषद, चर्चासत्र, कार्यशाळा किंवा इतर कार्यक्रमात त्यांचे नाव नेहमीच घेतले जाते. ते आज आपल्यात नाहीत, परंतु ग्रंथालय माहिती विज्ञान या विषयातील त्यांच्या अमूल्य योगदानाचे हे क्षेत्र नेहमीच स्मरण करेल आणि ऋणी राहील.



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

# जननायक बिरसा मुंडा



आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह : स्वामी देवेंद्रानंदगिरी

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दुःखाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो.

**(गुरु वचन)**

गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे. साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## अशोकायन...

**विणवणी**

हे वरुणराजा –
उशीरा का बरस पण
मधात पाडू नको खंड
नाहीतर बळीराजाला
विकावा लागेल भूखंड ..!
मारावे की तारावे
आहे तुझ्या हाती
एवढी कृपा कर
दयाधना आमच्या वरती ..!
समतोल बरसून
येऊ दे पिके बहरून
बळीच्या मनोकामना
पूर्ण कर तुझ्या हातून .. !



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

**वाचक लिहितात**

## राऊत, हे वागणे बरे नव्हे!

नुकत्याच पार पडलेल्या आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघ तब्बल १८ वर्षांनी विजेता ठरला. विजेतेपद मिळाल्याच्या प्रित्यर्थ आनंद साजरा करण्यासाठी चिन्नास्वामी क्रीडांगणावर विजयी सोहळा आयोजित करण्यात आला होता. भारतात क्रिकेटचे किती वेड आहे, हे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच त्या सोहळ्याला आणि विजयी मिरवणुकीला अक्षरशः लाखो क्रिकेट चाहत्यांनी गर्दी केली. पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता. परंतु, इतकी गर्दी होईल, याची कोणालाही कल्पना नसल्याने एकच गोंधळ उडाला. गर्दीला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. अचानक लाठीमार झाल्याने पळापळ सुरू झाली; आणि चेंगराचेंगरी झाली.

होऊ नये अशी दुर्घटना झाली; आणि यात ११ क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला. तर, ३३ जण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे विजयोत्सवाला गालबोट लागले, हे मात्र नक्की. वाटले होते कर्नाटक सरकार हा कार्यक्रम पुढे ढकलेल. परंतु, या गंभीर दुर्घटनेकडे दुर्लक्ष करत खेळाडूंचा सत्कार करून त्यांच्यावर लाखो रुपयांच्या बक्षिसांची उधळण करण्यात आली.

या दुर्घटनेबद्दल आपले अतिविद्वान विश्वप्रवक्ते संजय राऊत यांना पत्रकारांनी विचारले असता, त्यांनी यात सरकारचा काहीही दोष नसून, किती गर्दी करावी ? हे लोकांना समजायला हवे, असा प्रतिप्रश्न करून एकप्रकारे या दुर्घटनेला क्रिकेट चाहत्यांनाच जबाबदार धरले. कारण, कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असल्याने त्यांचा नाईलाज झाला. पण, याच महाशयांनी प्रयागराज येथे कुंभमेळ्यात आणि मागच्या वर्षी दहीसर येथे आप्पा धर्माधिकारी यांच्या कार्यक्रमावेळी झालेल्या चेंगराचेंगरीला सरकारला जबाबदार धरून प्रचंड तोंडसुख घेतले होते. कारण, दोन्ही ठिकाणी भाजपचे सरकार आहे. यावरून त्यांच्या मनात भाजपबद्दल किती द्वेष, तिरस्कार, असुया, मळमळ आहे, हे स्पष्ट होते. याला टीका नव्हे तर, गरळ ओकणे म्हणतात. अर्थात, २४ तास मुर्खांच्या नंदनवनात फिरणा-या 'माथेफिरू'कडून काय अपेक्षा ठेवणार ? एका (सं) पादकाला अशी 'डबल ढोलकी' वाजवणे शोभते का ? म्हणूनच त्यांना सांगावेसे वाटते की, राऊतसाहेब, हे वागणे बरे नव्हे!

- प्रदीप व्ही. खोलमकर,
नाशिक.

## सणांवर विनोद करू नका !

आताचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. तरुणाई दिवसातील आपला बराच वेळ हा सोशल मीडियावर व्यतीत करत असते. सण-उत्सव जवळ आले की त्याविषयी जशा माहिती देणाऱ्या रिल्स सोशल मीडियावर येऊ लागतात तशा त्या सण-उत्सवांवर विनोद करणाऱ्या, सणांविषयी गैरसमज पसरवणाऱ्या रिल्स आणि व्हिडीओज सोशल मीडियावर फिरू लागतात. वटपौर्णिमा जवळ आल्याने वटपौर्णिमा सण साजरा करण्यामागील शास्त्र अथवा या सणाचे महत्व लक्षात न घेता त्यावर फालतू विनोद करणाऱ्या अनेक रिल्स सध्या मोबाईलवर येऊ लागल्या आहेत. हिंदू असूनही आपल्याच सणांवर विनोद करणाऱ्या त्या रिल्स पाहून आपण हसत आहोत आणि त्या इतरांनाही पाहण्यासाठी फॉरवर्ड करत आहोत. वटपौर्णिमा झाली की सण-उत्सवांना सुरुवात होते. सृष्टीत होत जाणारे बदल तसेच धर्मग्रंथातील सत्यकथा यांचा आधार हिंदू धर्मातील सण आणि उत्सवांमागे दडलेला असतो. प्रत्येक गोष्ट ही ईश्वराचेच रूप असून जीवसृष्टीसह निर्जीव वस्तूतही त्याचे अस्तित्व असते त्यामुळे या सर्वांचा सन्मान करण्याची शिकवण या सणांच्या माध्यमांतून आपल्याला मिळत असते. वटपौर्णिमेला वडाला म्हणजेच वृक्षाला पुजले जाते. नागपंचमीला नागाला, तर पोळ्याच्या दिवशी बैलाला पुजले जाते. दसऱ्याच्या दिवशी वापरातील उपयुक्त शस्त्रांचे आणि वस्तूंचे पूजन केले जाते. पितृपक्षाच्या निमित्ताने कावळ्याच्या रूपाने पूर्वजांना घास भरवला जातो. अशाप्रकारे चराचरावर निरपेक्ष प्रेम करायला शिकवणारे हिंदू धर्मातील सण हिंदू धर्माचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून सणांविषयी न मिळणारे ज्ञान यांमुळे हिंदूंच्या सण-उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना यांना फारसे वावगे वाटत नाही; मात्र ज्यांना आपले सण आणि उत्सव याविषयीचा सार्थ अभिमान आहे त्यांनी अशा रिल्स किंवा व्हिडीओज पुढे न पाठवता ते पाठवणाऱ्यांना सणांमागील शास्त्र सांगावे,

सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

# डिझेल, पेट्रोलची साठवणूक, पोलिसांचा छापा

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जून**

धोत्रा शेत शिवारातील पंडित धाब्याजवळ केलीजातहोती, या अवैध साठवणुकीवर पोलिसांनी कारवाई करीत १६ हजार रुपयांचा माल जप्त केला, ही कारवाई करीत १६ हजार रुपयांचा माल जप्त केला, ही कारवाई गुरुवारी केली, याप्रकरणी काशीफ आसिफ शेख (वय ३३, आशीर्वाद नगर नागपूर, ह. मु. सेलू) सय्यद रिजवान अली मेहमूद अली सय्यद (खडकी, सेलू) व गुड्डू पठान याच्या विरुद्ध सावंगी पोलिसात गुन्हा नोंद केला,

धोत्रा परिसरात अवैध पेट्रोल डिझेलची साठवणूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली, यावरुन पोलिसांनी कारवाई करीत शेतालगत असलेल्या दोन घरांची झडती घेतली असता एकूण जुमला किंमत १६ हजार रुपयांचा माल जप्त केला, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ईको पार्क मधील कामांना गती देत गुणवत्तापुर्वक करा - पालकमंत्री डॉ. भोयर

## ईको पार्क मधील कामांचा आढावा



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जून**

सालोड व पिपरी मेघे येथे तयार करण्यात येणा-या ईको पार्क, ऑक्सीजन मुक्तांगण पार्क मधील कामांना गती द्या. कामे चांगल्या दर्जाची व गुणवत्तापूर्वक करा. आराखड्यातील मंजूर कामाव्यतीरिक्त करावयाच्या आवश्यक कामांचे तत्काळ अंदाजपत्रक तयार करावे, अशा सुचना राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ईको पार्कमध्ये करण्यात येणा-या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित विभागांना सुचना केल्या.

बैठकीला जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, उपवनसरंक्षक हरवीर सिह, उप विभागीय वनअधिकारी सुहास बडेकर, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता महेश मोकलकर, मतीन नळगिरे, वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर, सालोडचे उपसरपंच आशिष कुचेवार आदि उपस्थित होते. वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व पर्यटन विभागाच्या माध्यमातून सालोड व पिपरी मेघे येथे ईकोपार्क तसेच पिपरी मेघे येथील हनुमान टेकडी येथे ऑक्सीजन पार्क मुक्तांगण पार्कमधील कामांचा पालकमंत्र्यांनी सविस्तर आढावा घेतला.

पर्यावरणपूरक पर्यटन ही काळाची गरज आहे. धकाधकीच्या जीवनात थोडा विरंगुळा मिळावा, यासाठी ईको पार्कची निर्मिती करण्यात येत आहे. आगामी काळात ईको पार्क तयार होईल तेव्हा जिल्ह्यातीलच नव्हे तर बाहेरील लोक सुध्दा येथे येतील.

जिल्ह्यातील इतर पर्यटन स्थळांबरोबरच ईको पार्कच्या माध्यमातून जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना मिळेल व स्थानिकांना रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल, यासाठी मंजूर कामे तातडीने करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

# ६ वर्षीय जलतरणपटू आशिष ठरला ४ पदकाचा मानकरी

## ५० मी.मध्ये ३ सुवर्णपदक तर बँक स्ट्रोकमध्ये १ रजत पदक

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,दि. ०८ जून**

वाशी,नवी मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र स्टेट सीनिअर अँन्ड लोअर एज ग्रुप चॅम्पियनशिप मध्ये वर्धा जिल्ह्याचा संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक करणारा वर्धेचा ६वर्ष वयोगटातील स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडीयाची चॅम्पियनशिप पटकावणारा सर्वात लहान जलतरणपटू अभिनंदन आशिष डोणे ठरला. वर्धेचा पहीला जलतरण पटू



अभिनंदन आशिष डोने ह्याने ५० मी. फ्रीस्टाइल, ५० मी. ब्रेस्टस्ट्रोक, ५० मी. बटरफ्लाय, मध्ये ३ सुवर्ण पदक. आणि बँक स्ट्रोक मध्ये १ रजत पदक प्राप्त करून एकूण ४ पदकांची कमाई करुन चॅम्पियनशिप मिळवली.

अभिनंदन आशिष डोने याने वर्धेत इतिहास रचला, तसेच ओम अरुण नागोसे वय (११) याने वैयक्तिक मीडले प्रकारात ४६ जलतरण पटूत ६ वे स्थान प्राप्त करून उत्कृष्ट कामगिरी करत सर्वाचे लक्ष वेधून घेतले. हे दोन्ही जलतरणपटू वर्धा येथील एकमेव जलतरण तलाव येथे जलतरण प्रशिक्षक, सांजली वानखेडे, नरेश पाटणकर, मंगेश लांडगे, अविनाश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.अभिनंदनचे जलतरण मित्र परिवार आणि नागरिकांनी कौतूक केले.

# सर्वेक्षण करीत नुकसान भरपाई द्या

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८जून**

सेलू व वर्धा तालुक्यात वादळी वा-यासह आलेल्या अवकाळी पावसाने केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या कर्मचा-यांनी शेताच्या बांधावर येऊन पहाणी केली.

नियमानुसार पंचनामे करण्यात आले नाही. जिल्हा प्रशासनाने तत्काळ झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करुन केळी उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी पवनार, रेहकी,वडगाव येथील शेतक-यांकडून करण्यात येत आहे.

## प्रवीण फटींग इंडियन एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**
**वडनेर,दि. ०८जून**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त आयोजित इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२५ साठी दारोडा येथील तंटामुक्ती समिती अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते प्रवीण विठ्ठल फटींग यांची निवड करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने १ जून रोजी त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या सत्कार करण्यासाठी इंडियन एक्सलन्स अवॉर्डचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यातून ७५८ प्रस्ताव या पुरस्कारासाठी आले होते. त्यापैकी सामाजिक, शिक्षण ,वैद्यकीय, क्रीडा ,कला, पत्रकारिता या क्षेत्रातील एकूण १२२ जणांची निवड करण्यात आली. त्यात सामाजिक कार्यकर्ते प्रवीण फटींग यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना इंडियन एक्सलन्स अवॉर्ड पुरस्काराने मलकापूर (जि बुलढाणा) येथे पार पडलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

# शिवराज्यभिषेकानिमित्त शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन

**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी ,दि. ०८ जून**

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मुहूर्तावर येथील शिवराय जन्मोत्सव समिती व आमदार सुमित वानखेडे मित्रपरिवारतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करुन पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष पुरुषोत्तम नागपुरे व विजय वाघमारे उपस्थित होते.

कार्यक्रमाला न. पा. उपाध्यक्ष पुरुषोत्तम नागपुरे,



विजय वाघमारे, नंदकुमार वैद्य,दिनेश हरेल, मुधोळकर महाराज, अविनाश देशमुख,पवन ढोले, अनिकेत माळोदे, नावेद,उज्वल कौंडण्यपुरे, अनिरुद्ध होणाडे,गौरव होणाडे, प्रशांत सूर्यवंशी, मंगेश लाडके, अरुण पंड्या,अमोल बडघरे, निनाद धरमठोक, डॉ अभिलाष धरमठोक, अमित बिरोले,श्याम गोडबोले,नीरज जयस्वाल व अन्य आमदार सुमित वानखेडे मित्र परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भरधाव ट्रकच्या धडकेत युवक जखमी

**वायगाव (नि) :** येथील चौरस्ता परिसरात ट्रकने दुचाकीला दिल्याने झालेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाला, शुक्रवारी सकाळी हा अपघात झाला,

कानगाव भैय्यापुर येथील रहिवासी साहिल अशोक गवली हे दुचाकीवरुन (क्र. एम.एच. ३२, बी. ४७२४ ) वर्धा येथे जात असताना हिंगणघाटकडून येणा-या ट्रकने (क्र. एम. एच. ४९- ०७१०) दुचाकीला धडक दिली, त्यात साहिल जखमी झाला, याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# आधार फाऊंडेशनतर्फे वेदांतची लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघार्ट, दि. ०८ जून**

केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच लागला असुन या परीक्षेत स्थानिक रिठे कॉलनी येथील वेदांत प्रभाकर कोळसे या विद्यार्थ्याने देशात ३६६ वा क्रमांक मिळवून त्यांची लेफ्टनंट पदी निवड झाली आहे. यासाठी आधार फाऊंडेशन वतीने रोपटे, शाल व स्मृतिचिन्ह आणि मिठाई देऊन त्याचा तसेच वेदांतच्या आई -वडीलांचा सत्कार करण्यात आला.दरम्यान वेदांत कोळसे याने आपल्या यशाचा प्रवास कथन केला. यावेळी आधार फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अतुल वांदिले अध्यक्षा माधुरी विहीरकर, निलेश गुल्हाने,प्रा.डॉ.शरद विहीरकर, जगदीश वांदिले, डॉ. गिरीधर काचोळे, चंद्रशेखर निमट,राजेश कासवा,मधुकर चाफले, सुरेश गुंडे, सुहास घिनमिने,माया चाफले, ज्योती धार्मिक, वैशाली लांजेवार आदी उपस्थित होते.

# अज्ञात व्यक्तीने केली ७६ हजाराने फसवणूक

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जून**

क्रेडीट कार्डचे प्रोटेक्शन सर्व्हीस चार्ज डी ॲक्टीव्हेट करण्याच्या नावाखाली युवकाची ७६ हजार ३२७ रुपयांनी फसवणूक करण्यात आली, ही घटना आर्वी येथे उघडकीस आली, याप्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला,

आर्वी येथील महाराणा प्रताप वॉर्डातील युवकाला फोनवर क्रेडीट कार्ड प्रोटेक्शन सर्व्हीस चार्ज ४ हजार ५६० रुपये ॲक्टीव्हेट झाल्याचे सांगितले, सर्व्हीस चार्ज डिॲक्टिवेट करण्याकरिता लिंक ओपन करण्यास सांगितले, लिंक ओपन केल्यानंतर ॲप्लीकेशन डाऊनलोड केले असता कार्ड ॲप डाऊनलोड झाले, त्यात वैयक्तिक माहिती आणि क्रेडिट कार्डची माहिती भरण्यास सांगितले, ती माहिती भरल्यानंतर पैसे कपात झाल्याचे संदेश आले, अज्ञात चोरटयाने सर्व्हीस चार्ज लागल्याचे खोटे बोलून तो हटविण्यासाठी माहिती भरुन घेत ७६ हजार ३२७ रुपयांनी फसवणूक केली, याप्रकरणी तक्रारीवरुन आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# संत केजाजी महाराज पायदळ दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**महासागर प्रतिनिधी**
**सेलू दि. ०८ जून**

आषाढी एकादशी निमित्त विदर्भाची प्रतीपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र घोराड येथून संत केजाजी महाराज पायदळ दिंडी शनिवारी सकाळी पंढरपूर कडे मार्गस्थ झाली दरवर्षी येथून ही पायदळ दिंडी काढण्यात येते.

संत नामदेव केजाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट चे दिंडीचालक हरीदास महाकाळकर तसेच श्याम महाराज सोनटक्के यांचे नेतृत्वाखाली ही भाविकांचा समावेश असलेल्या दिंडीचे पंढरपूर कडे प्रस्थान झाले ६ जूनला गावातील दिंडी मार्गाने मार्गक्रमण करीत भवानी मंदिरात मुक्कामास असलेली ही दिंडी शनिवारी सकाळी पंढरपूर कडे रवाना झाली टाळ मृदंगाचे गजरात हरिनामाचा गजर करीत पंढरपूर कडे जाणारी ही पायदळ दिंडी विवीध जिल्हयातून मार्गक्रमण करीत वर्धा, कळंब, यवतमाळ, हिंगोली, औंढा नागनाथ, बार्शी मार्गाने ४ जुलैला पंढरपूर येथे पोहचणार आहे या दिंडीतील भाविकासाठी अनेक अन्नदात्यानी आपले योगदान देत पंगतीचे आयोजन केले आहे.

## वृद्धाच्या पिशवीतुन ४६ हजार लांबविले

**हिंगणघाट:.** येथील महाराष्ट्र बँकेजवळ एका वृध्दांने पिशवीत ठेवलेले ४६हजार रुपये अज्ञात चोरट्याने लांबविले. उत्तम पोहाणे वय(६२) असे वृध्दाचे नाव असुन त्यांनी ४ जून रोजी दुपारी यवतमाळ कोकण बँकेतून ४६हजार रुपये आणले होते. त्यानंतर बँक ऑफ महाराष्ट्र येथून १लाख १५ हजार रु काढले, हे पैसे जेव्हा पिशवीत ठेवण्यास गेले तेव्हा त्यांना ४६ हजार रुपये दिसुन आले नाही. त्यांचा कोकण बँकेपासुन दोन महिला पाठलाग करीत असलयचे त्यांचे लक्षात आले. सीसीटिव्ही कॅमे-याची तपासणी केली असता असता महिला पाठलाग करीत असल्याचे लक्षात आले, याप्रकारणी हिंगणघाट पो.स्टे. तक्रार देण्यात आली असुन पुढील तपास पोलिस करीत आहे.

## आजचा वाढदिवस

दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा




माहेश्वरी कुकुर्डे


विभावरी बाळसराफ


सुजाता पाटील


पुरुषोत्तम कांबळे


आकाश नेवल


महेश पेंदे


मोहन कडू


नितीन चौधरी


सुशांत नरताम

# डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत सार्वभौम भारत हाच योग्य पर्याय - धम्मा कांबळे




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,दि. ०८जून**

संविधान हा खऱ्या अर्थान मानवमुक्तीचा प्रलेख आहे, ते भारत राष्ट्र कसे असेल ह्याचे व्हिजन डाक्युमेंट आहे. संविधानाच्या स्विकृती नंतर भारत राष्ट्र उदयास आले, हे राष्ट्र जिवंत राहिले, अबाधित राहिले तरच आपले संविधान लोकशाही मानवी मुल्ये मानवी सभ्यता जिवंत राहील. धार्मिक वांशिक राष्ट्रवाद तीव्र झालेल्या भारत राष्ट्र विरुध्द हिंदू राष्ट्र ह्या वर्तमानात पेटलेल्या संघर्षावर डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत सार्वभौम भारत राष्ट्रवाद निर्माण करणे हाच एकमेव व योग्य पर्याय आहे व त्यासाठी सर्व भारतीयांनी कटिबद्ध असले पाहिजे. असे मत सामाजिक

## रमाई फाऊंडेशनव्दारा रमाई स्मृतिदिन

कार्यकर्ते धम्मा कांबळे यांनी व्यक्त केले.

रमाई स्मृतिदिनानिमित्त रमाई फाऊंडेशनद्वारा व्याख्यानाचे आयोजन सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयात करण्यात आले. होते यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते डॉ.अशोक राणा, प्रा. डॉ. हेमलता महिश्वर उपस्थित होत्या.. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. अशोक राणा म्हणाले की, सम्राट अशोकांच्या काळातच फक्त भारत हे राष्ट्र होते. त्यापूर्वी ते कधीही राष्ट्र नव्हते. संविधानाच्या माध्यमातून अथक परिश्रमाने डॉ. बाबासाहेबांनी भारत राष्ट्र निर्माण केले. ह्या राष्ट्रामध्ये दलित, आदिवासी, बहुजन, ख्रिश्चन, बौध्द, मुस्लीम ह्यांना संविधानामुळे समान दर्जा व अधिकार प्राप्त झाले आहेत. परंतु ह्या सर्वांचे स्थान व अधिकार नाकारणाऱ्या व फक्त हिंदूंच्याच हितांना प्राधान्य देणाऱ्या हिंदू राष्ट्राचे बाबासाहेब प्रखर विरोधक होते. त्यांचा राष्ट्रवाद हिंदुत्व विरोधी होता,डॉ. हेमलता महिश्वर म्हणाल्या की, संविधानाच्या प्रास्ताविकेत नमूद केलेल्या समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता ह्या प्रत्येक शब्दाच्या मूळाशी जावून सखोलपणे ही मानवी मूल्ये समजुन घेतली तरच व्यक्तीला खऱ्या अथनि माणूसपण, मनुष्यत्व प्राप्त होते. ह्यातली स्वातंत्र्याची संकल्पना पुर्णपणे समजुन घेतली तरच लोकशाही अर्थपुर्ण होवून ती प्रस्थापित होवू शकते. बुध्द वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. रमाई फाऊंडेशनच्या वतीने पाहुण्यांचा पुष्पगुच्छ, शॉल व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. ज्ञानेंद्र मुनेश्वर, प्रस्ताविक सरिता पखाले तर आभार जितेश कांबळे यांनी मानले.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

# कॅलिडोस्कोप

## दोन टक्के हिंदू, तरी साजरे होतात सर्व सण

विविध देशांमध्ये त्यांच्या आगळ्या वेगळ्या संस्कृती आणि प्रथा असतात. इंडोनेशियात या देशात फक्त दोन टक्के हिंदू असूनही तिथे रामभक्त आहेत आणि रामायणही सादर केलं जातं. इथे दिवाळीही उत्साहात साजरी केली जाते.

इंडोनेशिया हा जगातील तिसरा सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला देश आहे; परंतु असं असूनही, इथे हिंदू धर्माचं पालन केलं जातं. सुमारे ८९ टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या या देशात रामायण नृत्यनाट्य सादर केलं जातं. आजही इथे हजारो मंदिरं अस्तित्वात आहेत. इथे दररोज रामलीला कार्यक्रम आयोजित केला जातो. इंडोनेशियामध्ये रामलीलेकडे सांस्कृतिक वारसा म्हणून पाहिलं जातं. इंडोनेशियातील बाली बेटावर रामलीला कार्यक्रम इतक्या थाटामाटात साजरा केला जातो, की रस्त्यांवर होणारा उत्सव पाहण्यासारखा असतो. इथले मुस्लिम कलाकार राम, सीता आणि हनुमानाच्या पात्रांना जिवंत करतात.

**✻ रामायण पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक**

दिवाळीच्या काळात इथला थाटामाट पाहण्यासारखा असतो. इंडोनेशियन जावा बेटावरील प्रम्बानन हिंदू मंदिर परिसर रामायणाच्या चित्रणासाठी प्रसिद्ध आहे. रामायण पाहण्यासाठी केवळ भारतीय किंवा स्थानिक लोकच नाही, तर जगभरातील पर्यटक इथे येतात. रामायण वाल्मिकी ऋषींनी रचलं असलं तरी रामायणाच्या ३०० हून अधिक आवृत्त्या आहेत.

✻ रामकीन शहरात होणाऱ्या रामायणाच्या सादरीकरणाला रामकीन म्हणतात. रामकीन हे एक प्रकारचं नृत्यनाट्य आहे. ते पूर्णपणे रामायणावर आधारित आहे. रामायणातील पात्रांची नावं थोडी बदलली आहेत. रामायण नृत्यनाट्य १९७१ मध्ये सुरू झाले आणि ही परंपरा आजही सुरूच आहे. जगातील सर्वात जास्त काळ चालणारं नृत्यनाट्य म्हणून त्याचं नाव 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंदवलं गेलं आहे. बाली, पश्चिम पापुआ, सुलावेसी आणि सुमात्रा या ठिकाणी दिवाळी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इंडोनेशियामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची मंदिरंही आहेत. इथल्या प्रत्येक परिसरात एक हिंदू मंदिर आहे. इंडोनेशियातील मंदिरं दक्षिण भारतातील मंदिरांप्रमाणेच बांधली जातात. इथे सुमारे दीड हजार मंदिरं असल्याचं सांगितलं जातं. इथे राम आणि सीता दगडी कोरीवकामात किंवा रामायणाच्या अभिनयात असे सर्वत्र आढळतात.





## तरूतुरू चालणाऱ्या 'सिल्व्हर अँट'

तुरूतुरू चालणारी मुंगी तुम्ही पाहिली असेल. या मुंग्यांचा वेग प्रचंड असतो. शास्त्रज्ञांनी जगातल्या सर्वात जलद चालणाऱ्या मुंगीचा शोध लावला आहे. ही मुंगी सहारा वाळवंटात सापडली आहे. ट्युनिशियाच्या दक्षिण भागात या मुंग्या सापडल्या आहेत. या मुंग्यांना 'सिल्व्हर अँट' असं नाव देण्यात आलं आहे. या मुंग्या अवघ्या एका सेकंदात बरंच मोठं अंतर कापतात. शरीराच्या आकारापेक्षा १०८ पट अंतर अवघ्या एका सेकंदात कापणं त्यांना शक्य होतं. या मुंग्या इथल्या रणरणत्या उन्हातही अगदी सहज जिवंत रहातात. त्यांच्या शरीरावरच्या केसांमुळे सूर्याची किरणं परिवर्तित होतात. यामुळे या मुंग्यांना उन्हाच्या झळा लागत नाहीत. या मुंग्या चंदेरी रंगाच्या आहेत. म्हणूनच त्यांना सिल्व्हर अँट असं म्हटलं जातं. या मुंग्या ८५५ मीटर प्रतिसेकंद या वेगाने धावू शकतात. जर्मनीतल्या उल्म विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी या मुंग्यांवर संशोधन केलं आहे. या मुंग्या अन्नाच्या शोधासाठी दुपारच्या टळटळीत उन्हात बाहेर पडतात. या मुंग्यांना सहा पाय असतात. वारा वाहत असताना 'सिल्व्हर अँट' अधिक वेगाने धावतात. तर अशा या 'सिल्व्हर अँट' जगातलं एक आश्चर्यच आहे.

## सर्पदंशाचे रॅकेट

मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यात सर्पदंश घोटाळा समोर आला आहे. या घोट्याळ्यात प्रशासकीय व्यवस्थेतील निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. या घोटाळ्यात ४७ मृत व्यक्तींच्या नावावर वारंवार सर्पदंश झाल्याचे दाखवून पैसे काढण्यात आले आहेत.

फक्त एका जिल्ह्यातूनच सर्पदंश पीडितांना ११ कोटी रुपयांची कागदी भरपाई देण्यात आली आहे. सिवनी येथील एका व्यक्तीला ३८ वेळा सापाने दंश केला आणि प्रत्येक वेळी त्याच्या नावावर ४-४ लाख रुपये काढले गेले. मध्य प्रदेशात सापांची मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मृत व्यक्तींच्या नावावर मृत्यू प्रमाणपत्र, पोलिस पडताळणी आणि शवविच्छेदन अहवालाशिवायच बिल पास केले गेले.

मध्य प्रदेश सरकार सापाच्या दंशामुळे मृत्यू झाल्यास ४ लाख रुपयांची मदत देते. रमेश नावाच्या व्यक्तीला ३० वेळा वेगवेगळ्या घटनांमध्ये मृत घोषित केले गेले, तेही प्रत्येक वेळी सापाच्या दंशामुळे. असे करून भ्रष्ट अधिकाऱ्यांनी १ कोटी २० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला. इतकेच नाही तर रामकुमार नावाच्या व्यक्तीला सरकारी कागदपत्र दाखवून १९ वेळा मृत दाखवले गेले. हा घोटाळा २०१९ पासून सुरू झाला आणि २०२२ पर्यंत चालला. कमलनाथ सरकारमध्ये सुरू झालेला भ्रष्टाचाराचा सिलसिला शिवराज सरकारपर्यंत चालला.

**✻ प्रांताधिकारी दोषी**

या घोटाळ्यात तत्कालीन प्रांताधिकारी अमित सिंह आणि पाच तहसीलदारांची भूमिका संशयास्पद आढळली आहे. तपासादरम्यान या अधिकाऱ्यांच्या आयडी आणि अधिकारांचा गैरवापर करून खोटे कागदपत्र तयार केले गेले आणि त्याच आधारावर पैसे पास केले गेल्याचे आढळून आले. आतापर्यंत या संपूर्ण प्रकरणात फक्त सहायक सचिवाला अटक झाली आहे, तर इतर आरोपींवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.






## उताखयात फुललं जुनं प्रेम

असं म्हणतात की पहिलं प्रेम कधीच विसरत नाही. कितीही काळ गेला, तरी पहिलं प्रेम नेहमीच लक्षात राहतं. बिहारमधील पूर्णियामध्येही असंच एक उदाहरण पाहायला मिळालं.

अनेक वर्षांपूर्वी गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंडमध्ये संवाद सुरू झाला. त्यांच्या कुटुंबीयांना हे मान्य नव्हतं. म्हणूनच त्यांची लग्नं वेगवेगळ्या व्यक्तिंशी लावून देण्यात आली. बराच काळ लोटला. दोघांना मुलंही झाली. दोघेही आपापल्या कुटुंबात आनंदी होते; पण एका भेटीने सगळं बदललं. एका ६० वर्षीय वकिलाला अचानक त्याची पूर्वाश्रमीची प्रेयसी दिसली, तेव्हा त्याला विश्वासच बसला नाही. व्यवसायाने डॉक्टर असलेली प्रेयसीही तिच्या माजी प्रियकराला पाहून भावूक झाली. दोघेही बोलू लागले. डॉक्टर मैत्रिणीच्या पतीला हे कळलं. तो या नात्याला विरोध करू लागला.

एके दिवशी त्याची पत्नी तिच्या माजी प्रियकरासह पळून गेली होती. तथापि, ही एक हायप्रोफाइल केस असल्याने, पोलिस सक्रिय झाले आणि पुन्हा एकदा दोघे एकमेकांपासून वेगळे झाले. आता ही प्रेमकहाणी परिसरात चर्चेचा विषय बनली आहे.

**मुले मोठी, तरी..**

ते दोघे पळून गेल्यावर महिला डॉक्टरच्या पतीने वकिलाविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली. त्या महिला डॉक्टरचा नवराही डॉक्टर आहे. त्याला दोन मुलं आणि एक मुलगी आहे. दोन्ही मुलं एमबीबीएसचं शिक्षण घेत आहेत, तर मुलगी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहे.

**✻ साठ वर्षांनी पुन्हा प्रेमात**

महिला डॉक्टर आणि वकील तरूणपणी एकमेकांच्या प्रेमात होते. त्या वेळी दोघेही दिल्लीत एकत्र शिकत होते. कुटुबियांना त्यांच्या प्रेमाबद्दल कळलं तेव्हा त्यांनी या नात्याला नकार दिला. दोघांच्याही कुटुंबीयांनी त्यांचे लग्न वेगवेगळ्या ठिकाणी केले. महिला डॉक्टरला एक डॉक्टर नवरा मिळाला. वकिलालाही त्याचा जीवनसाथी सापडला. दोन्ही कुटुंबं आनंदाने राहत होती. दरम्यान, एका दिवशी महिला डॉक्टरला अचानक तिचा प्रियकर भेटला. या भेटीत तरूणपणीचे दिवस आठवलं आणि दोघांमधील प्रेम पुन्हा फुलू लागलं. महिला डॉक्टरच्या पतीला हे कळलं तेव्हा त्याने विरोध केला. परंतु वकील त्या महिला डॉक्टरला गुप्तपणे भेटत राहिला. गेल्या आठवड्यात पती क्लिनिकमध्ये जाताच महिला डॉक्टर तिच्या प्रियकरासह पळून गेली. २४ तासांच्या आत सहरसा येथे दोघांनाही शोधून काढण्यात आलं.

**✻ डॉक्टर महिलेने ओलांडल्या मर्यादा**

क्लिनिक सोडून घरी पोहोचलेल्या डॉक्टरने पत्नीच्या प्रियकरावर गुन्हा दाखल केला. हे प्रकरण खूप गाजलं. पोलिसांनी दोघांच्याही मोबाईलवर पाळत ठेवली. महिला डॉक्टरच्या पतीने पोलिसांना सांगितलं, त्याने पत्नीच्या प्रियकराला घरी येण्यापासून अनेक वेळा रोखलं होतं. परंतु ती क्लिनिकमधून बाहेर पडताच तो घरी पोहोचत असे. या मुद्द्यावरून त्याने त्याच्या पत्नीशी अनेक वेळा भांडण केलं. त्याच्या पत्नीशी झालेल्या भांडणाच्या वेळी मुलं मध्यस्थी करत. या वेळी मात्र पत्नीने सर्व मर्यादा ओलांडल्या आणि प्रियकरासोबत पळून गेली. मात्र पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतलं आहे.




## उत्सव जुळ्या मुलांचा

नायजेरियामध्ये 'इग्बो ओरा' नावाचं शहर आहे. या शहराला जुळ्या मुलांची राजधानी असं म्हटलं जातं. कारण जगातली सर्वाधिक जुळी मुलं इथेच जन्माला येतात. म्हणूनच इथे जुळ्यांच्या उत्सवाचं आयोजन केलं जातं. या उत्सवात जगभरातली जुळी भावंडं सहभागी होतात. लहान बाळांपासून १०० वर्षांच्या आजीआजोबांपर्यंत विविध वयोगटातली भावंडं इथे पहायला मिळतात. एका अहवालानुसार अमेरिकेत प्रत्येकी हजार मुलांमागे ३३ जुळ्या मुलांचा जन्म होतो. मात्र इग्बो ओरामध्ये जन्म घेणाऱ्या एक हजार मुलांमधली ५० मुलं जुळी असतात. इग्बो ओरामध्ये जुळ्या मुलांच्या जन्माचं प्रमाण एवढं अधिक का आहे, याबाबत संशोधन सुरू असून याबाबत फारशी माहिती हाती आलेली नाही. इथल्या महिलांच्या आहारविहाराच्या सवयींमुळे जुळ्या मुलांचा जन्म होत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. मात्र शास्त्रज्ञांनी याबाबत शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे या भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर जुळी मुलं का जन्म घेतात, हे एक गूढच आहे.



## हेअर बँकेत जपून ठेवा केस

ब्लड बँकेबद्दल तर आपण जाणतोच. या ब्लड बँकेत लोकांनी दान केलेलं रक्त साठवून ठेवलं जातं. हे रक्त आवश्यकतेनुसार विविध रुग्णालयांमध्ये पुरवलं जातं. याच धर्तीवर मँचेस्टरमध्ये एक हेअर बँक सुरू करण्यात आली आहे. सध्या केस गळण्याचं प्रमाण वाढत चालल्यामुळे बऱ्याच लोकांना टक्कल पडतं. हे टक्कल पडल्यानंतर अनेक जण केशरोपण करून घेतात. या हेअर बँकेत आपण आपले केस फ्रीज करून ठेऊ शकतो. टक्कल पडू लागल्यावर हेच केस केशरोपणासाठी वापरता येऊ शकतात. केस फ्रीज करण्यासाठी भारतीय चलनात दोन लाख ३० हजार रुपये खर्च येईल. या हेअर बँकेमुळे पुरुषांना अधिक लाभ होणार आहे. पुरुषांमध्ये टक्कल पडण्याच्या समस्येत वाढ होत चालली आहे. या ब्लड बँकेमुळे टक्कल पडू लागल्यानंतर पुरुष मंडळी अगदी सहज केशरोपण करून घेऊ शकतील. ब्रिटनमध्ये जवळपास ६५ लाख पुरुषांना टक्कल पडलं आहे. हेअर बँकेतले केस उणे १८० अंश सेल्सियस तापमानात फ्रीज करून ठेवण्यात येणार आहेत. हेअर बँकेत केस फ्रीज करून मग त्यांचं केशरोपण करण्याचा खर्च प्रचंड असेल. मात्र हा अनोखा उपक्रम आहे, असंच म्हणावं लागेल.

## हाताचे चुंबन घेण्याची प्रथा

आपला देश विविधतेने नटलेला आहे. सर्व धर्म, पंथाळचे लोक इथे राहतात. त्यामुळे विविध प्रथा परंपरा आपल्याला पाहायला मिळतात. राजस्थानमध्येही अशा अनेक परंपरा आहेत. या परंपरांमुळे राजस्थानला 'रंगीला राजस्थान' म्हणून ओळखलं जातं. कारण इथल्या प्रत्येक प्रदेशाचे स्वतःचे वेगळे रीतिरिवाज आहेत. एकीकडे पाय दाबून स्वागत करणं हा राजस्थानच्या संस्कृतीचा एक भाग आहे, तर दुसरीकडे हाताचं चुंबन घेऊन आदर दाखवण्याची प्रथा आहे.



राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील संदेराव गावात रबारी समुदायाचे लोक राहतात. त्यांची एक अनोखी परंपरा आहे. त्यात मोठ्यांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वजण आदर दाखवण्यासाठी हाताचं चुंबन घेतात. परदेशात हे सर्वसामान्य आहे. पण आपल्याकडे अजून ही प्रथा रुजली नाही. राजस्थानमध्ये एकीकडे महिला त्यांच्या वडिलधाऱ्यांसमोर येताना चेहरा झाकतात, तर दुसरीकडे पाली येथील रबारी समुदायाचे लोक स्वागत करण्यासाठी एकमेकांच्या हातांचं चुंबन घेतात. पुरुष आणि स्त्रिया दोघांचाही यात समावेश असतो.

**✻ विदेशी संदर्भ**

मध्ययुगीन युरोपमध्ये हाताचं चुंबन घेणं हे सौजन्य आणि आदराचं लक्षण होतं. हे विशेषतः उच्चवर्गीय आणि राजघराण्यांमध्ये प्रचलित होतं. पुरुष अनेकदा विशेषतः उच्च वर्गातील स्त्रियांच्या हाताचं चुंबन घेऊन आदर किंवा निष्ठा दाखवत असत. ही प्रथा प्रेमसंबंध, भक्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठेतील फरक दर्शवणारी होती. ही पद्धत पोलंड, फ्रान्स, इटली आणि रशियासारख्या देशांमध्ये विशेष लोकप्रिय होती

**✻ भारतात हाताचं चुंबन घेण्याची प्रथा**

भारतात हाताचं चुंबन घेण्याची प्रथा काही प्रमाणात युरोपीयन संस्कृतीच्या प्रभावामुळे पाळली जाते. ही प्रथा भारतीय संस्कृतीत तितक्या खोलवर रुजली नाही. भारतीय संस्कृतीत, आदर दर्शविण्यासाठी नमस्कार करणं, पायांना स्पर्श करणं किंवा डोकं टेकवणं या प्रथा अधिक प्रचलित आहेत. काही समुदायांमध्ये विशेषतः शहरी आणि पाश्चात्य प्रभाव असलेल्या भागात हातांचं चुंबन घेणं हे प्रेम किंवा सौजन्याचं लक्षण मानलं जातं. एखाद्याला ही पद्धत स्वीकारायची असेल, तर त्याने दुसऱ्या व्यक्तीची संमती आणि सांस्कृतिक संवेदनशीलता लक्षात घेतली पाहिजे.

## ड्रग्ज तस्करीत मांजर!

मानवाला या पृथ्वीवरील सर्वात स्वार्थी प्राणी म्हटले, तर त्यात काहीही चुकीचे नाही. कारण तो स्वतःच्या फायद्यासाठी कोणाचाही चुकीच्या गोष्टीचा वापर करू शकतो. कधीकधी माणूस स्वार्थात इतका आंधळा होतो, की तो प्राण्यांचा चुकीच्या पद्धतीने वापर करण्यासही मागेपुढे पाहत नाही. यासंदर्भातील एक घटना उघडकीस आली आहे.

**✻ तुरुंगात**

ड्रग्ज पुरवण्यासाठी मांजरींचा वापर केला जातो. मध्य अमेरिकेतून हे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. मध्य अमेरिकेतील कोस्टा रिका येथील तुरुंगात ड्रग्जची तस्करी करण्यासाठी मांजराचा वापर केला जात असे. तुरुंग प्रशासनाने एका मांजराला ड्रग्जचे पॅकेट बांधलेले असताना पकडले. ही घटना पाहिल्यानंतर तुरुंगातील कैद्यांनी खेळलेला खेळ आहे, असे वाटले; परंतु सत्य उघड झाले तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.



**✻ चौकशी सुरू**

मांजराला असे पाहिल्यानंतर लोकांनी चौकशी सुरू केली. हे एखाद्या संघटित तस्करी टोळीचे काम आहे का, यात तुरुंगातील कैदी आणि बाहेरील नेटवर्क गुंतलेले आहे का, याचा शोध पोलिस घेत आहेत. याशिवाय, या पॅडीज नेटवर्कमध्ये प्राण्यांचा वापर ड्रग्ज तस्करीसाठी करण्यात एखादा कैदी सामील आहे का, हेही शोधण्याचा पोलिस प्रयत्न करत आहेत.

# वैद्यकीय मदतीच्या अर्जांवर नियमानुसार कार्यवाही व्हावी

## बदल्यांचे अर्ज प्रशासकीय मार्गानेच सोडवा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**

वैद्यकीय मदतीसाठी शासनाकडे आलेले अर्ज संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ मार्गी लावावेत. नियमानुसार या अर्जावर तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले. तसेच जनसंवाद कार्यक्रमात बदल्यांची निवेदने स्वीकारण्यात येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आज पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या संवाद कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांना २५६ टोकन आस्थेवाईकपणे वितरित करण्यात आली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवेदनांचा स्वीकार करीत संबंधितांना कार्यवाहीचे निर्देश दिले. यात प्रामुख्याने वैद्यकीय मदतीचे अर्ज तत्काळ मार्गी लावावेत. जनसंवाद हा उपक्रम सर्वसामान्यांच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी आहे. त्यामुळे बदल्यांचे अर्ज प्रशासकीय मार्गानेच सोडवावेत, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले.

प्रामुख्याने सांडपाणी, वीज, पाणी, रस्ते कामांची निवेदने पाहायला मिळाली. यात नगरपंचायत, नगरपरिषद, ग्राम स्तरावरील कामांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे दिसून आले. महिलांपासून वयोवृध्द नागरिकांपर्यंत, तरूणांपासून दिव्यांग व्यक्तींनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना आपली निवेदने दिली.

निवेदन देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यादृष्टीने मंडप, नाश्ता, चहा व कुलर्सची व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांनी स्वयंशिस्तीचा प्रत्यय देत टोकन पद्धतीनुसार निवेदने दिली.

नागरिकांची शासनाकडे प्रलंबित व नियमानुसार करता येणारी कामे दिरंगाई न करता तातडीने पूर्ण करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी शासकीय विभागांना दिले. सर्व निवेदने, समस्या व इतर प्रकरणांविषयी संबंधित विभागाने प्राधान्याने कार्यवाही करावी, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी निर्देश दिले.

# भाजपने दरोडा टाकत निवडणूक आयोगाच्या मदतीने विजय मिळवला

## नाना पटोलेंचा गंभीर आरोप



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**

महायुती तसेच भाजपवर कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी एका लेखातून जोरदार टीका केली होती. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत भाजपने दरोडा टाकत निवडणूक आयोगाच्या मदतीने विजय मिळवला, असा आरोप कॉंग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला आहे. तसेच राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर निवडणूक आयोग पुराव्यासह खुलासा का करत नाही? असा सवालही पटोले यांनी उपस्थित केला आहे.

नाना पटोले म्हणाले, निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले, त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६५.०५ टक्के झाल्याचे सांगितले, यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. तब्बल ७६ लाख मतांची ही वाढ असून मतदानाचा टक्का कसा वाढला? हा मतांवर सरळ सरळ दरोडा टाकलेला आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, चंदिगड महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतपत्रिकेत कसा घोटाळा करून भाजपाला विजयी घोषित केले होते हे सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून जगाने पाहिले आहे. वाराणसी लोकसभा मतदारसंघात सुरुवातीपासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी पिछाडीवर होते नंतर यंत्रणा कामाला लागली व निकाल वेगळा लागला हे उघड झाले आहे. निवडणूक काळात भाजपच्या मर्जितील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना कशी जबाबदारी दिली हेही उघड आहे.

भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने निवडणूक जिंकलेली आहे. लोकशाहीला हा कलंक असून निवडणूक आयोगाच्या विश्वासाहर्तेवरही मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः निवडणूक आयोगाची बाजू मांडली. आताही फडणवीस, बावनकुळे हे निवडणूक आयोगाची बाजू मांडत आहेत. भाजपचे नेते निवडणुक आयोगाचे वकील आहेत का. शिर्डी मतदारसंघात ७ हजार मतदार कसे वाढवले याचे पुरावे आहेत. ज्या मतदारसंघात मतदारांची जेवढी मतदार संख्या बोगस पद्धतीने वाढविली तेवढेच मताधिक्य त्या मतदारसंघात भाजपला मिळाले आहे. पुराव्यानिशी मतदार याद्यातील घोटाळा व बोगस मतदान दाखवतो, हिम्मत असेल तर भाजपा नेत्यांनी ते खोडून दाखवावे, असे आव्हान पटोले यांनी केले.

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ८ :**



शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तसेच शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ आणि दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे बेमुदत अन्नत्याग करणार आहेत. मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीजवळ (८ जून) आंदोलनाची जोरदार सुरुवात होणार आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील संत गाडगेबाबा मंदिरापासून ते मोझरी येथील समाधीपर्यंत भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत राज्यभरातून तब्बल २० हजार शेतकरी सहभागी होणार आहेत. आंदोलनपूर्वी बोलताना आमदार बच्चू कडू यांनी ठाम भूमिका मांडली. ते म्हणाले, आमची अंत्ययात्रा निघाली तरी चालेल, पण आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. त्यांच्या या विधानामुळे आंदोलनाच्या तीव्रतेचा अंदाज येतो.

बच्चू कडू म्हणाले, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर मच्छीमारांसाठी आंदोलन करत आहे. यासंदर्भात शासनाकडून आश्वासन मिळाली होती. परंतु त्याची पुर्तता झाली नाही. आता जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही. शेतमालांचे भाव पडलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव दिला पाहिजे. घरकुलाचा मुद्दा आहे. मच्छीमारांचा, मेंढपाळ यांचा मुद्दा आहे. अनेक वेळा पत्र देऊनही मागण्या मान्य झाल्या नाही. त्यामुळे अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

दिव्यांगांना मिळणारे मानधन वेळेवर मिळत नसल्याची तक्रार आहे. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, अधिकारी आणि मंत्र्यांचे पगार वेळेवर होत आहे. परंतु दिव्यांगांचा निधी वेळेवर मिळत नाही. निराधारांचे पगार वेळेवर होत नाही. सरकार जाणीवपूर्वक मुद्द्यांच्या लढाईपासून लोकांना दूर करत आहे. त्यामुळे आता जोपर्यंत मागण्या मंजूर होत नाही, तोपर्यंत आम्ही तिथून हटणार नाही. माझी अंत्ययात्रा निघाली, तरी आम्ही आमच्या मुद्द्यांपासून दूर होणार नाही. निवडणुका संपल्यानंतर सत्ता स्थापन होऊन बरेच महिने उलटूनही सरकारकडून या आश्वासनांची पूर्तता केली जात नाही. म्हणून अन्नत्याग आंदोलन सुरू करीत आहोत, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

# अनैतिक संबंधातून महिलेसह दोन मुलांचा खून

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

रांजणगाव गणपती गावच्या हद्दीत झालेल्या तिहेरी खून प्रकरणाचा उलगडा झाला आहे. हा खून महिलेच्या नातेवाइकानेच अनैतिक संबंधातून केला असल्याचे उघड झाले आहे. या खून करणाऱ्यास ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांना २५ मे रोजी खंडाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक महिला आणि दोन लहान मुलांचे मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडले होते.

स्वाती केशव सोनवणे( २५,रा. माळेवाडी, जि, बीड), स्वराज (३) आणि विराज (१) अशी मृतांची नावे आहेत. तर खूनप्रकरणी गोरख पोपट बोखारे (३६,रा.सदरवाडी, शिरुर) असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, ओळख पटवण्यासाठी सर्वच जिल्ह्यांत २८ अंमलदाराची सहा पथके पाठविण्यात आली होती. त्यांनी प्रत्येक जिल्ह्यातील बेपत्ता व्यक्तींची माहिती घेतली. तेव्हा माजलगाव पोलिस ठाण्यात एक महिला बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या पतीने दिल्याचे आढळले. पतीकडे चौकशी केल्यावर ती आळंदी येथे आईवडिलांकडे गेल्याचे समजले. चारच महिन्यांपूर्वी गोरखने पती व स्वातीतील वाद मिटवला होता. स्वाती आळंदीला आल्यावर तिने गोरखकडे विवाहाचा तगादा लावला. यामुळे वाद झाल्यावर गोरख तिला आणि दोन्ही मुलांना दुचाकीवर घेऊन सुनसान रस्त्यावर रात्री घेऊन आला. त्याने स्वातीचा गळा आवळला आणि डोक्यात दगड घालून खून केला होता.

# सायबर पोलिसांकडून ई- मेलचे तांत्रिक विश्लेषण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**

शुक्रवारी सकाळी ईमेलद्वारे पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटना (पेसो) च्या कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली होती. या प्रकरणात सायबर पोलिसांनी ई-मेलचे तांत्रिक विश्लेषण करून गिट्टीखदान पोलिसांकडे पाठविले आहे. आता पोलिस संबधीत कंपनीशी संपर्क साधणार आहेत. कंपनीकडून सखोल तपासणीनंतर ज्या नंबरद्वारे ई-मेल पाठविण्यात आला. त्याचा मोबाईल नंबर पोलिसांना मिळेल, अशी माहिती सायबर पोलिसांनी दिली.

सेमिनरी हिल परिसरात सीजीओ कॉम्प्लेक्स आहे. भव्य इमारतीत केंद्राची अनेक कार्यालये आहेत. पाचव्या मजल्यावर पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटना (पेसो) चे कार्यालय आहे. नेहमीप्रमाणे कर्मचारी शुक्रवारी सकाळी कार्यालयात पोहोचले. काही वेळातच कार्यालयाच्या मेलवर धमकी मिळाली. दुपारी २.३० वाजेपर्यंत सीजीओ इमारतीला बॉम्बस्फोटाने उडवले जाईल. असा मजकूर ईमेलमध्ये होता. धमकीची माहिती क्षणात वाऱ्यासारखी पसरली. काही वेळातच इमारत रिकामी करण्यात आली. तत्पूर्वी गिट्टीखदान पोलिसांना माहिती देण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलाश देशमाने पथकासह घटनास्थळी पोहोचले. सोबतच बॉम्ब शोध व नाशक पथक, श्वान पथकही घटनास्थळी पोहोचले. दिवसभर इमरतीचा कानाकोपरा पिंजून काढला. मात्र, काहीच आढळून आले नाही. कर्मचारी, पोलिसांची निव्वळ तारांबळ आणि धावपळ झाली. ई-मेलचे तांत्रिक विश्लेषण करण्यासाठी सायबर पोलिसांकडे पाठविण्यात आले.

# भंडारा जिल्हा नियोजन बैठकीत राडा

## खासदार-पालकमंत्र्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची, मोबाईल हिसकावल्याने झाला वाद

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ८ :**

भंडारा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सत्ताधारी व विरोधी आमदारांमध्ये जोरदार खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. खासदार प्रशांत पडोळे यांच्या सोशल मीडिया हँडलरचा मोबाईल काढून घेण्यात आल्याने कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. यावरून खासदार प्रशांत पडोळे व पालकमंत्री सावकारे यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाल्याचे म्हटले जात आहे. सध्या जिल्ह्यात या राड्याची जोरदार चर्चा आहे.




रविवारी भंडारा जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला पालकमंत्री संजय सावकारे देखील उपस्थित होते. मात्र काही विषयांना घेऊन खासदार प्रशांत पडोळे व पालकमंत्री यांच्यात विकास निधी वरून संबंधित बाचाबाची होत असताना खासदार यांच्या सोशल मीडिया चालवणाऱ्या मुलाने व्हिडिओ घेतला असल्याने पालकमंत्री संतापले व त्या मुलाचा मोबाईल हिसकावून त्याला सभागृहाबाहेर पाठवले. हा विषय रविवारी चर्चेचा बनला असून सभागृहात देखील आमदार, खासदार व पालकमंत्र्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली असल्याची खमंग चर्चाही आता होऊ लागलेली आहे. दरम्यान, प्रसारमाध्यमांशी बोलताना पालकमंत्र्यांनी हा किरकोळ विषय असल्याचे सांगत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील सावरबंध व पवनी तालुक्यातील घोडा यात्रेसाठी प्रसिद्ध असलेल्या अड्याळ या दोन गावांना क वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून मंजुरी मिळाली. राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली भंडारा जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीची बैठक रविवारी (दि. ८ जून) झाली. या बैठकीला जिल्हा परिषद अध्यक्षा कविता उईके, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार नाना पटोले,आमदार परिणय फुके,आमदार नरेंद्र भोंडेकर,आमदार राजू कारेमोरे,आमदार अभिजीत वंजारी, जिल्हाधीकारी डॉ.संजय कोलते,मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींदकुमार साळवे,पोलीस अधीक्षक नुरुल हसन, आदींची उपस्थिती होती.

दरम्यान, या बैठकीत ३१ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले व अनुपालन अहवालास मान्यता प्रदान करण्यात आले.तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत मे महिनाअखेर झालेल्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली. यावेळी भंडारा आमदार नरेंद्र भौंडेकर यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाबाबतचा मुद्द मांडला त्यावर शासकीय महाविद्यालयाच्या कामाला गती देण्यासाठी लवकरच बैठक लावण्यात येईल असे पालकमंत्री सावकारे यांनी सांगितले.

जिल्ह्यात एप्रिल- मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टी दरम्यान झालेल्या धान पिकाचे नुकसान व पंचनाम्याबाबत सर्व लोकप्रतिनिधींनी मुद्दा उपस्थित केला.

## नीतेशने जपून बोलावे : नीलेश राणे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

धाराशिव येथील भाजपच्या मेळाव्यात मंत्री नीतेश राणे यांनी दिलेल्या आक्रमक वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात चर्चेची नवी लाट निर्माण झाली आहे. शिवसेनेवर अप्रत्यक्ष निशाणा साधत नीतेश राणे यांनी, सगळ्यांचा बाप म्हणून भाजपचाच मुख्यमंत्री बसलाय, हे लक्षात ठेवा, असे म्हटले होते.



त्यांच्या या वक्तव्यानंतर महायुतीतील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा समोर आला आहे. या वक्तव्यावर आता नीतेश राणे यांचे बंधू आणि भाजप नेते नीलेश राणे यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना नीलेश राणे यांनी लिहिले, नीतेशने जपून बोलावे... मी भेटल्यावर बोलेनच पण आपण बोलताना सगळ्या गोष्टींचे भान ठेवून बोलले पाहिजे. सभेत बोलणे सोपे आहे पण आपल्या बोलण्यामुळे आपण नेमकं कोणाचा फायदा करतोय याचं भान असले पाहिजे. नीलेश राणे यांच्या या प्रतिक्रियेमुळे नीतेश राणे यांच्या भाषणशैलीवर आणि वक्तव्यांवर भाजपमध्येच अस्वस्थता असल्याचे स्पष्ट होत आहे. महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि भाजप हे दोन प्रमुख घटक असून, त्यांच्यात सुसंवाद आणि समन्वय राखणे ही दोन्ही पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. असल्याचे भाजपच्या अंतर्गत काही नेत्यांना वाटतंय, हे नीलेश राणे यांच्या प्रतिक्रियेतून सूचित होत आहे.

# लाडकी बहीणच्या आडून भाजपने निवडणूक हायजॅक केली : संजय राऊत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**



कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या लेखातून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवरून भाजपवर टीका केली होती. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाल्याचे पाहायला दिसत आहे. तसेच आजच्या पत्रकार परिषदेत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील महाराष्ट्र विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाने हायजॅक केल्याचा दावा केला आहे. लाडकी बहीण योजनेच्या आडून भाजपने त्यांचे चांगभलं केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले, राहुल गांधी यांनी जे म्हटले आहे ते आम्ही पूर्वीपासूनच सांगत होतो. राज्यातील विधानसभा निवडणूक ही भाजपने चोरली, लुटली आणि दरोडा घातला. राहुल गांधी हे सातत्याने तेच सांगत आहेत आणि आम्ही सुद्धा तेच बोलत आहोत. राज्यात भाजपा आणि त्यांच्या टोळ्यांचा विजय होऊच शकत नव्हता. सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणूक आम्ही जिंकल्यावर असे त्यानंतरच्या सहा महिन्यात काय घडले की ज्याच्यामुळे तुम्हाला इतका मोठा एकतर्फी विजय प्राप्त व्हावा, असा सवाल त्यांनी महायुतीला विचारला. ते तर २५ जागा सुद्धा जिंकू शकत नव्हते, असा दावाही संजय राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले, लाडकी बहीण या आवरणाखाली ही निवडणूक भाजपने हायजॅक केली. राहुल गांधी यांनी जे पाच मुद्दे उपस्थित केले ते वारंवार केले आहेत आणि आंतरराष्ट्रीय मंचावर सुद्धा उपस्थित केल आहेत. भारतातील लोकशाही ही मोदी-शाह-फडणवीस यांनी हायजॅक केली. निवडणूक आयोगापासून अनेक संवैधानिक संस्थांना त्रास दिला आहे. खोटं बोलण्याचा नोबेल पुरस्कार भारतीय जनता पक्ष आणि त्यांचे नेते मोदी यांना द्यायला हवा, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना संजय राऊत म्हणाले, त्यांचे बाळासाहेबांवरील प्रेम बेगडी आहे. २०२२ मध्ये जेव्हा शिवसेनेत बंड झाले, एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार घेऊन बंड केला. शिंदेंनी थेट सेनेवरच ताबा सांगितला. त्यावेळी ते खूप घाबरले होते. एकनाथ शिंदे माझा अत्यंत जवळचा मित्र. तो मला सांगत होता माझ्याबरोबर चल. मी म्हटले तू पण जाऊ नको, तुम्ही का जात आहात? अयोध्येला आम्ही एकत्र गेलो होतो. माझ्या खोलीत येऊन मला ते सांगत होते की आपण जाऊ. शेवटी एकनाथ शिंदे हे घाबरुनच गेले. पुढे संजय राऊत म्हणाले, मला ते म्हणाले माझं तुरुंगात जायचे वय नाही. आता मला नातवंडे झाली. मी म्हटले मलाही नातवंडे झाली आहेत. पण म्हणून पक्षाने आपल्याला जे इतकी वर्षे दिलेय त्यांच्या छातीवर पाय ठेवून बाहेर पडणे हे मी बाळासाहेब ठाकरेंशी प्रतारणा केल्यासारखे होईल.

# राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत सौर ऊर्जेचा वापर

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार मेधा कुलकर्णी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, आमदार भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी, महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे फडणवीस म्हणाले.

महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजीत पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे.

# आगामी साहित्य संमेलन साताऱ्याला

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**



आगामी ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फाऊंडेशनला मिळणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे येथे रविवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या सह सर्व घटक, संलग्न संस्थांचे प्रतिधिनी उपस्थित होते. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित करण्यात आली होती. ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देऊन आली. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ, औदुंबर, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा इचलकरंजी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शाहूपुरी सातारा या संस्थांकडून निमंत्रणे आली होती. या स्थळांना भेटी दिल्यानंतर स्थळ निवड समितीची बैठक पुणे येथे झाली.